७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १०८ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये




# आशा भोसले यांचे निधन

## भारतीय संगीतविश्वावर अधिराज्य गाजवणारा, सुरांचा अमर स्वर कायमचा शांत

**मुंबई (दै. संध्या)**

ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले आहे. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात रविवारी दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांना शनिवारी संध्याकाळी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. ब्रीच कँडी रुग्णालयाचे डॉ. प्रतीक समदानी यांनी पीटीआय या वृत्तसंस्थेला सांगितले की, आशा भोसले यांना अनेक वैद्यकीय समस्या होत्या आणि मल्टी-ऑर्गन फेल्युअरमुळे त्यांचे निधन झाले. डॉ. प्रतीक समदानी यांनी सांगितले की, आशा भोसले यांना मल्टी-ऑर्गन फेल्युअरचा त्रास होता, म्हणजेच त्यांचे अनेक अवयव निकामी झाले होते. आशा भोसले यांचे पुत्र, आनंद भोसले यांनी सांगितले की, ज्यांना अंत्यदर्शन घ्यायचे आहे ते उद्या सकाळी ११ वाजता त्यांच्या घरी येऊ शकतात. उद्या दुपारी ४ वाजता शिवाजी पार्क येथे अंत्यविधी होणार आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, "हे आपल्या सर्वांसाठी एक मोठे नुकसान आहे" देवेंद्र फडणवीस म्हणाले, "संपूर्ण भारत आणि जगभरातील संगीतप्रेमींसाठी हा एक दुःखद क्षण आहे. त्या सर्वात अष्टपैलू कलाकारांपैकी एक होत्या. संगीत क्षेत्रातील त्यांची सेवा आणि मंगेशकर परिवाराचे योगदान अतुलनीय आहे. आम्ही आधी लता दीदींना गमावले आणि आता हे नुकसान पाहत आहोत. आम्ही सर्वजण खूप दुःखी आहोत. हे आपल्या सर्वांसाठी एक मोठे नुकसान आहे. आम्ही शोकाकुल कुटुंबासोबत आहोत." ममता बॅनर्जी म्हणाल्या की, आशा भोसले एक असाधारण आणि प्रेरणादायी गायिका होत्या, ज्यांनी पिढ्यानपिढ्या लोकांच्या हृदयावर राज्य केले. त्या पुढे म्हणाल्या की, आशा भोसले यांनी अनेक बंगाली गाणी गायली आणि त्या बंगालमध्ये प्रचंड लोकप्रिय होत्या. २०१८ मध्ये त्यांना राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान, 'बंगा बिभूषण' प्रदान करण्यात आला होता. ममता बॅनर्जी यांनी त्यांच्या कुटुंबीयांप्रति, संगीत क्षेत्राप्रती आणि जगभरातील त्यांच्या लाखो चाहत्यांप्रति तीव्र शोकसंवेदना व्यक्त केल्या.

आर.डी. बर्मन यांच्या आईने म्हटले होते की लग्न माझ्या मृतदेहावरच होईल आशा भोसले यांनी संगीतकार आरडी बर्मन यांच्याशी दुसरे लग्न केले होते. त्यांची पहिली भेट 1956 मध्ये झाली होती.

त्यांची घट्ट मैत्री आणि संगीताचा प्रवास 'तिसरी मंझिल' (1966) या चित्रपटादरम्यान सुरू झाला. नंतर, एकत्र काम करत असताना त्यांची चांगली मैत्री हळूहळू प्रेमात बदलू लागली. 12,000 हून अधिक गाणी गायली आहेत. त्यांची "दम मारो दम", "पिया तू अब तो आजा" आणि "चुरा लिया है तुमने" यांसारखी गाणी आजही सदाबहार आहेत. आशा भोसले यांच्यासाठी संगीताचा प्रवास इतका सोपा नव्हता.




वयाच्या 10 व्या वर्षी पहिल्यांदा 'माझा बाल' (1943) या मराठी चित्रपटासाठी 'चला चला नवबाला' हे गाणे गायले.

'सावन आया रे' हे गाणे सर्वप्रथम 'चुनरिया' (१९४८) या हिंदी चित्रपटात गायले. १४ हून अधिक भाषांमध्येही गायन केले आहे.

चित्रपटगीते, पॉप, गझल, भजन, शास्त्रीय संगीत यांसारख्या विविध प्रकारांतील १२,००० हून अधिक गाणी गायली.



2011 — सर्वाधिक गाण्यांसाठी गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्समध्ये नोंद.



2008 — राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांनी त्यांना पद्मविभूषण पुरस्कार प्रदान केला.



2000 — दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



1997 — ग्रॅमी पुरस्कारासाठी नामांकन मिळवणारी पहिली भारतीय गायिका


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

e-paper www.sandhyaepaper.com


## ढिंग-टांग




# 'ई-बाईक टॅक्सीचालकांना मंडळात सामावून घेणार' - मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई (दै. संध्या)**

महामुंबईसह राज्यातील ऑटो आणि टॅक्सी चालकांसाठी स्थापन करण्यात आलेल्या धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा व मीटर टॅक्सी चालक कल्याण मंडळामध्ये आता ई बाईक टॅक्सी चालकांनादेखील सामावून घेणार असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सांगितले. तसेच सभासद नोंदणी शुल्क रद्द करणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यातील असंघटित क्षेत्रातील ऑटो रिक्षा व मीटर टॅक्सी चालकांना सरकारी योजनांचा लाभ मिळावा, या उद्देशाने शासनाने 'धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा, मीटर टॅक्सी चालक कल्याणकारी मंडळा'ची स्थापना केली आहे. दरम्यान, या मंडळामध्ये नोंदणी शुल्क आणि वार्षिक शुल्कावरून वाद निर्माण झाला होता. याला विरोध करत ऑटो रिक्षा मेन्स युनियनचे अध्यक्ष शशांक राव यांनी काही दिवसांपूर्वी आंदोलन केले होते, तर नोंदणी शुल्क रद्द न केल्यास ते आणखी तीव्र करण्याचे संकेत त्यांनी दिले होते.



सरनाईक यांच्या मते मुंबईमध्ये धावणाऱ्या अनधिकृत बाईक टॅक्सीवर कारवाईही सुरू आहे. तसेच तात्पुरत्या स्वरूपात ज्यांचे परवाने रद्द केलेले आहेत, त्यांना कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर पुन्हा परवाने देण्यात येतील.

राज्यात रिक्षा चालवायची असल्यास रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी येणे बंधनकारक असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले. त्यांच्या मते जर प्रवासी मराठीत बोलत असेल तर चालकाला मराठी येणे अनिवार्य आहे. तसेच मराठी न येणाऱ्या चालकांना परवाना दिल्याचे निदर्शनास आल्यावर आरटीओ अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे त्यांनी सांगितले.

# सत्तेतला मोठा पक्ष सत्तेतल्या मित्रांची शिकार करणार : खरात प्रकरण असेच बाहेर आलेले नाही; रोहित पवारांचा मोठा दावा

## पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत शिकार केली जाणार असल्याचेही ट्विट

**मुंबई (दै. संध्या)**

सत्तेतला मोठा पक्ष सत्तेतल्या मित्रांची शिकार करणार, असे वक्तव्य राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केले आहे. पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत शिकार केली जाणार असल्याचेही त्यांनी ट्विट करत म्हटले आहे. तसेच भोंदू अशोक खरात प्रकरण असेच बाहेर आलेले नाही तर ठरवून आणले गेले असल्याचा दावा रोहित पवार यांनी केला आहे.

रोहित पवार ट्विट करत म्हणाले, भाजपचे सत्तेतले मित्रपक्ष विरोधी पक्षाचे आमदार खासदार फोडणार असल्याच्या बातम्या बघितल्या, परंतु वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे, पुढच्या महिन्याच्या शेवटपर्यंत सत्तेतल्या मोठ्या पक्षाकडून सत्तेतल्या त्यांच्या मित्रांचीच शिकार केली जाणार असल्याची पक्की माहिती आहे. महाराष्ट्राला काळिमा फासणारे भोंदू खरात प्रकरण असेच बाहेर आलेले नाही तर ठरवून आणले गेले असून ही फक्त सुरुवात असल्याचे पवार म्हणाले. पुढे रोहित पवार म्हणाले, आज भाजप मित्रपक्षांप्रती जरी 'ए दोस्ती हम नही छोडेंगे' ची भावना दाखवत असले तरी उद्या मित्रपक्षांची भावना भाजपाबाबत "जा बेवफा जा हमे..." याहून वेगळी असणार नाही हे नक्की आहे. त्यामुळे आपलीच भाजपकडून शिकार होऊ नये यासाठी मित्रपक्षांनी अधिक काळजी घेणेच उचित राहील, असा सल्लाही त्यांनी दिला आहे.



भोंदू अशोक खरात प्रकरणावर बोलताना रोहित पवार यांनी धक्कादायक शंका उपस्थित केली. ते म्हणाले, "पुरोगामी महाराष्ट्रात जर काही नेते 'ब्लॅक मॅजिक' (जादूटोणा) करत असतील, तर त्यांची नावे समोर येणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकरणाची एसआयटी चौकशी सुरू आहे आणि अनेक गोष्टी बाहेरही आल्या आहेत. मात्र, अद्याप काही बड्या नेत्यांची माहिती का दडवली जात आहे? त्या व्हिडिओंचा आणि पुराव्यांचा वापर भाजप राजकीय दबाव आणण्यासाठी किंवा नेत्यांना आपल्या बाजूने वळवण्यासाठी करत आहे का?" असा सवालही रोहित पवार यांनी उपस्थित केला.

## ब्रेकिंग न्यूज

### गॅस वितरणातील गोंधळ सुरूच

पिंपरी (दै. संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील घरगुती गॅस सिलिंडर वितरणात गोंधळ दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. गॅस बुकिंग करूनही चार दिवसांत सिलिंडर मिळणे अपेक्षित असताना, १० ते १५ दिवस उलटूनही गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात येत आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी बुकिंगनंतर ९६ तासांत घरपोच सिलिंडर देणे बंधनकारक केले होते. ओटीपी प्रणालीद्वारेच वितरण करावे आणि थेट गोदामातून विक्री बंद करावी, असे आदेश देण्यात आले होते. मात्र, तरीही परिस्थितीत कोणताही बदल झालेला दिसत नाही. उलट एजन्सीकडून आदेशांकडे दुर्लक्ष होत आहे. चार दिवस सोडाच, दहा-पंधरा दिवस उलटूनही गॅस मिळत नाही. काही ठिकाणी ओटीपी मिळाल्यानंतरही सिलिंडर मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. एजन्सीकडून समाधानकारक उत्तर मिळत नसल्याने नागरिक त्रस्त आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात लाखो गॅस ग्राहकांना ७५ हून अधिक एजन्सींमार्फत पुरवठा केला जातो. परंतु, अचूक आकडेवारीचा अभाव, नियोजनातील त्रुटी आणि देखरेखीतील कमतरता यामुळे वितरण व्यवस्था कोलमडल्याची टीका होत आहे.

# तुम्हाला हिंदूत्वाची व्याख्या शिकवणारे सावरकरही नास्तिकच होते - काँग्रेस

# मुख्यमंत्री साहेब, हिंदू धर्मातही नास्तिकता मान्य आहे बरं!





Sachin Sawant सचिन सावंत
@sachin_inc

Show translation

आदरणीय शरद पवार साहेबांच्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. संघ विचारांच्या भोंदू बाबा, तथाकथित स्वयंघोषित आचार्य आणि विद्वेष पूर्ण विचारधारा पसरविणारे किर्तनकार यांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. वारकरी संप्रदायाने भक्तीमार्गाने ईश्वराला सर्वसामान्यांना जोडून दिले व जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद व धर्मभेद न मानता समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केला, समाजाचे प्रबोधन केले.पण हे घुसखोर समाजात जाणिवपूर्वक द्वेष पसरविण्याचे काम करत आहेत. यांच्यापासून सावध राहण्याची आवश्यकता आहे. गेले अनेक शतके संतांच्या प्रबोधनात्मक अभंग व इतर साहित्यात घुसखोरी करण्याचा मनुवाद्यांनी प्रयत्न केला त्याचाच हा पुढील भाग आहे.

राहता राहिला शरद पवार साहेब नास्तिक आहेत का नाहीत हा प्रश्न तर हिंदू धर्मात नास्तिकता ही मान्य आहे बरं! मुख्यमंत्री साहेब, नाहीतरी हिंदूत्वाची व्याख्या तुम्हाला

**मुंबई (दै. संध्या)**

वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांचा शिरकाव झाल्याच्या शरद पवारांच्या भूमिकेचे काँग्रेसने जोरदार समर्थन केले आहे. शरद पवारांच्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. संघ विचारांच्या भोंदू बाबा, तथाकथित स्वयंघोषित आचार्य व विद्वेष पूर्ण विचारधारा पसरवणाऱ्या किर्तनकारांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला जात आहे, असे काँग्रेसने म्हटले आहे. मुख्यमंत्र्यांना हिंदूत्वाची व्याख्या शिकवणारे सावरकरही नास्तिकच होते, असेही काँग्रेसने या प्रकरणी म्हटले आहे.

शरद पवारांनी शासकीय महिला अधिकाऱ्यांच्या अखिल भारतीय साहित्य संमेलनानिमित्त प्रकाशित झालेल्या एका स्मरणिकेत एक लेख लिहिला आहे. त्यात वारकरी संप्रदायात प्रतिगामी विचारसरणीच्या लोकांनी घुसखोरी केल्याचा दावा केला आहे. त्यांच्या या भूमिकेवर भाजपने जोरदार टीका केली आहे. हिंदू धर्म व वारकरी संप्रदायाचा कायम द्वेष करणाऱ्या मौलाना शरद पवारांना आता वारकरी संप्रदाय धर्मांध वाटू लागला आहे. त्यांना जाळीदार टोपी घालून इफ्तार पार्ट्या झोडताना ते लोक धर्मांध वाटत नाहीत, असे भाजपने म्हटले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेस सरचिटणीस सचिन सावंत यांनी आपल्या पक्षाची उपरोक्त भूमिका विषद केली आहे.

**प्रतिगामी घुसखोरांकडून द्वेष पसरवण्याचे काम :**

सचिन सावंत रविवारी एका पोस्टमध्ये म्हणाले, आदरणीय शरद पवार साहेबांच्या मताशी आम्ही पूर्णपणे सहमत आहोत. संघ विचारांच्या भोंदू बाबा, तथाकथित स्वयंघोषित आचार्य आणि विद्वेष पूर्ण विचारधारा पसरविणारे किर्तनकार यांच्या माध्यमातून वारकरी संप्रदायात घुसखोरी करण्याचा प्रयत्न केला जात आहे. वारकरी संप्रदायाने भक्तीमार्गाने ईश्वराला सर्वसामान्यांना जोडून दिले व जातीभेद, लिंगभेद, वर्णभेद व धर्मभेद न मानता समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न केला, समाजाचे प्रबोधन केले. पण हे घुसखोर समाजात जाणिवपूर्वक द्वेष पसरविण्याचे काम करत आहेत. यांच्यापासून सावध राहण्याची आवश्यकता आहे.


# लाडकी बहीण लाभार्थी महिलांसोबत घडला धक्कादायक प्रकार

## E-KYC करून देण्यासाठी शरीरसुखाची मागणी

**जळगाव (दै. संध्या)**

महाराष्ट्रात चर्चेत असलेल्या लाडकी बहीण योजनेची ई-केवायसी करण्यासाठी महिलांकडे शरीरसुखाची मागणी करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. लाडकी बहीण योजनेच्या ईकेवायसीच्या नावाखाली अशी मागणी करण्यात येत असल्याचे समोर आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे.

जळगावात लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसीच्या बहाण्याने एका नराधमाने महिलेकडे शरीरसुखाची मागणी केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. आरोपी रमेश चव्हाण याने योजनेसाठी लागणारी कागदपत्रे गोळा करण्याच्या नावाखाली पीडित महिलेचे घर गाठले आणि ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून देण्याच्या बदल्यात तिच्याकडे शरीरसंबंध ठेवण्याची मागणी केली. या धक्कादायक मागणीमुळे हादरून गेलेल्या महिलेने अजिबात वेळ न घालवता थेट पोलिस ठाणे गाठले आणि या विकृत प्रवृत्तीविरुद्ध तक्रार नोंदवली.




**विनयभंगाचा गुन्हा दाखल :**

या प्रकरणाच्या तपासादरम्यान चव्हाण याने अन्य एका महिलेशीही गैरवर्तन केल्याचे उघड झाले आहे. त्याने निवृत्ती वेतन पुन्हा सुरू करून देण्याचे आमिष दाखवून त्या महिलेकडे शरीरसुखाची मागणी केली होती. शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या नावाखाली महिलांच्या असहायतेचा गैरफायदा घेणाऱ्या या आरोपीविरोधात जळगाव शहर पोलिस ठाण्यात विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशासकीय कामाच्या बहाण्याने घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून मोठी खळबळ उडाली आहे.

## संपादकीय

# पार्थची भाषा आणि तटकरे यांची भूमिका : राजकारणातील बदलते संकेत

महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या घडणाऱ्या घडामोडींनी एक गोष्ट स्पष्ट केली आहे – राजकारण केवळ पदे, सत्ता किंवा आघाड्यांपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते आता प्रतिमा, भूमिका आणि स्पष्टतेच्या राजकारणाकडे झुकत आहे. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील नेते सुनील तटकरे आणि पार्थ पवार यांच्याभोवती फिरणारा वाद हा केवळ व्यक्तीपुरता न राहता, दोन वेगवेगळ्या राजकीय शैलींचा संघर्ष ठरत आहे.

पार्थ पवार यांनी घेतलेली ठाम भूमिका, 'जे व्हायचे ते होईल' या स्पष्ट शब्दांत मांडलेली भूमिका, आणि काँग्रेसच्या निर्णयावर दिलेली प्रतिक्रिया – हे सगळे पाहता, आजच्या तरुण पिढीला भावणारी आक्रमक व थेट राजकारणाची भाषा त्यांच्या माध्यमातून पुढे येताना दिसते. याउलट, सुनील तटकरे यांची भूमिका अधिक मवाळ, पारंपरिक आणि राजकीय समतोल राखणारी वाटते. हीच दरी आज चर्चेचा विषय ठरत आहे. राजकारणात अनुभव महत्त्वाचा असतो, हे निर्विवाद; परंतु बदलत्या काळानुसार भाषा, शैली आणि धोरणे बदलणेही तितकेच आवश्यक आहे. पार्थ पवार यांनी दाखवलेली धाडसाची आणि स्पष्टतेची शैली ही नव्या राजकारणाची चिन्हे मानली जात आहेत. त्यांनी काँग्रेसच्या उमेदवारी मागे घेण्याच्या निर्णयावर स्वतःची भूमिका स्पष्ट ठेवली, कोणतीही माघार घेतली नाही, आणि त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक वेगळी छाप निर्माण झाली.



दुसरीकडे, सुनील तटकरे यांनी काँग्रेसच्या निर्णयाचे स्वागत करत आभार मानले. हा दृष्टिकोन राजकीय शिष्टाचाराच्या चौकटीत बसणारा असला, तरी तो आक्रमक राजकारणाच्या नव्या पिढीला पुरेसा पटणारा नाही. प्रश्न असा आहे की, आजच्या राजकारणात मवाळपणा टिकतो का, की ठामपणा आणि आक्रमकता यांनाच अधिक महत्त्व प्राप्त होत आहे? या प्रकरणात आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे पक्षांतर्गत मतभेद आणि त्यांचे सार्वजनिक स्वरूप. पार्थ पवार, रोहित पवार, सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार यांच्याकडून आलेल्या विविध प्रतिक्रिया पाहता, एकाच पक्षात वेगवेगळ्या भूमिका आणि दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतात. हे लोकशाहीचे लक्षण मानावे की संघटनात्मक विसंगती, हा विचार करण्याचा विषय आहे.

शरद पवार यांची प्रतिक्रिया देखील या संदर्भात महत्त्वाची ठरते. पार्थच्या परिपक्वतेबद्दल त्यांनी व्यक्त केलेले मत हे केवळ एका व्यक्तीवरचे भाष्य नसून, पक्षातील नव्या पिढीबद्दलच्या अपेक्षा आणि शंका यांचे प्रतिबिंब मानता येईल. अशा वेळी पक्षातील वरिष्ठ नेतृत्वाने स्पष्ट भूमिका घेत नव्या पिढीला दिशा देणे गरजेचे असते.

आजच्या तरुण मतदारांना थेट, स्पष्ट आणि निर्धारयुक्त भाषा आवडते. त्यांना गोलमोल राजकारणापेक्षा स्पष्ट भूमिका अधिक पटते. त्यामुळे पार्थ पवार यांची शैली ही भविष्यातील राजकारणाची दिशा ठरू शकते, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.यातून एक व्यापक प्रश्न समोर येतो – महाराष्ट्रातील पारंपरिक राजकारण नव्या पिढीच्या आक्रमक आणि स्पष्ट शैलीशी जुळवून घेणार का? की हा संघर्ष आणखी तीव्र होणार? अखेरीस, राजकारणात भूमिका महत्त्वाची असते, पण त्याहून अधिक महत्त्वाची असते ती वेळेची जाण. आजची वेळ स्पष्टतेची आहे, ठामपणाची आहे. या बदलत्या वास्तवात जे नेते स्वतःला घडवतील, तेच पुढे टिकतील. बाकी, इतिहास अशाच वळणांवर दिशा बदलतो – आणि कदाचित आज महाराष्ट्राचे राजकारण अशाच एका वळणावर उभे आहे.

## संस्कृत सुभाषित

ध्यानमूल गुरोर्मूर्तिः पूजामूलं गुरो । पद्म । मंत्रमूलं
गुरोर्वाक्यं, मोद्यमूलं गुरो: कृपा ॥

अर्थ – गुरूचरित्रातील हे वचन आहे. श्री गुरू हेच सर्वस्व । ध्यान करायचे ते श्रीगुरूंच्या मूर्तीचे. पूजा श्री गुरूंच्या चरणांची, गुरूवाक्य हेच सर्वस्व आणि श्री गुरुंची कृपा हाच मोक्ष.

## आगामी साप्ताहिकी

१३ एप्रिल २०२६ सोमवार
वरुथिनी एकादशी
श्री वल्लभाचार्य जयंती
रेडासमाधी उत्सव – आले (जुन्नर)
काळभैरव यात्रा – सोनारी पारंडा (धाराशिव)

१४ एप्रिल २०२६ मंगळवार
भारतरत्न डॉ. बाबा साहेब आंबेडकर जयंती
तिथिवासर सकाळी . ६. ५४ पर्यंत
वैशाखी (पंजाब)
मुक्ताबाई यात्रा – नारायणगाव (पुणे)

१५ एप्रिल २०२६ बुधवार
प्रदोष
शिवरात्री
श्री अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी
संत गोरोबा काका पुण्यतिथी

१६ एप्रिल २०२६ गुरुवार
अमावास्या प्रारंभ
रात्रौ ८.११

१७ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
दर्श अमावास्या
नारायणस्वामी पुण्यतिथी – नृसिंहवाडी
अमावास्या समाप्ती सायं ५.२२

१८ एप्रिल २०२६ शनिवार
वैशाख मासारंभ
चंद्रदर्शन
वज्रेश्वरी पालकी
भानुदास महाराज पुण्यतिथी – सातेफळ (अमरावती)

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९१७

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | | | | | | 8 |
| 4 | | | 6 | | | 7 | 5 | |
| 8 | 5 | | 4 | 1 | | | 3 | 6 |
| | 8 | 3 | | 2 | | 5 | | 4 |
| 1 | | | | | | | | 9 |
| 9 | | 7 | | 3 | | 2 | 8 | |
| 3 | 9 | | | 7 | 1 | | 4 | 5 |
| | 6 | 1 | | | 4 | | | 7 |
| 2 | | | | | | 1 | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ९१६ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 9 | 6 | 4 | 3 | 8 | 2 | 1 | 7 |
| 7 | 3 | 8 | 1 | 2 | 6 | 9 | 4 | 5 |
| 1 | 4 | 2 | 5 | 9 | 7 | 3 | 6 | 8 |
| 8 | 7 | 5 | 2 | 6 | 3 | 1 | 9 | 4 |
| 9 | 6 | 4 | 7 | 5 | 1 | 8 | 2 | 3 |
| 2 | 1 | 3 | 8 | 4 | 9 | 5 | 7 | 6 |
| 6 | 8 | 9 | 3 | 1 | 4 | 7 | 5 | 2 |
| 3 | 2 | 1 | 6 | 7 | 5 | 4 | 8 | 9 |
| 4 | 5 | 7 | 9 | 8 | 2 | 6 | 3 | 1 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १०५५ – व्हिक्टर दुसरा पोपपदी.
- ११११ – हेन्री पाचवा, पवित्र रोमन सम्राटपदी.
- १२०४ – चौथ्या क्रुसेडने कॉन्स्टेन्टिनोपल लुटले.
- १२५० – सातव्या क्रुसेडचा इजिप्तमध्ये पराभव. फ्रांसचा राजा लुई नव्वा युद्धबंदी.
- १८२९ – ब्रिटीश संसदेने रोमन कॅथोलिक व्यक्तिंना धर्मस्वातंत्र्य दिले.
- १८४९ – हंगेरी प्रजासत्ताक झाले.
- १८६१ – अमेरिकन गृहयुद्ध – दक्षिणेच्या सैन्याने फोर्ट सम्टरचा पाडाव केला.
- १९४१ – जपान व सोवियेत संघाने तटस्थतेचा तह केला.

### राष्ट्रीय

- १९३९ – भारतात हिंदुस्तानी लाल सेनेची स्थापना.
- २००८ – मॅरेथॉनमध्ये धावण्याचा विक्रम करणाऱ्या 'वंडर बॉय' बुधिया सिंगचे वादग्रस्त प्रशिक्षक बिरांची दास यांची भुवनेश्वर येथे अज्ञात इसमांनी गोळ्या झाडून हत्या केली.

### जन्म

- १७१३ – लॉर्ड फ्रेडरिक नॉर्थ, इंग्लंडचा पंतप्रधान यांचा जन्म.
- १७४३ – थॉमस जेफरसन, अमेरिकेचा तिसरा राष्ट्राध्यक्ष यांचा जन्म.
- १८६६ – बुच कॅसिडी, अमेरिकन लुटारूचा जन्म.
- १९६३ – गॅरी कास्पारोव्ह, रशियाचा बुद्धिबळपटूचा जन्म.

### निधन

- १६०५ – बोरिस गोडुनोव्ह, रशियाचा झारांचे निधन.
- १८६८ – ट्युवोड्रोस, इथियोपियाचा सम्राटांचे निधन.
- १९६६ – अब्दुल सलाम आरिफ, इराकचा राष्ट्राध्यक्षांचे निधन.
- १९७५ – फ्रांस्वा टोम्बालबाये, चाडचा राष्ट्राध्यक्षांचे निधन.

## उपदेशकथा

### शक्तिमान

सूर्य आणि वारा यांच्यात एकदा आपल्या शक्तीविषयी वाद जुंपला. दोघेही आपण सर्वात जास्त सामर्थ्यशाली असल्याचे पटवून देत होते. शेवटी रस्त्यावरून जाणाऱ्या एका वाटसरूच्या अंगावरील घोंगडी बाजूला काढून ठेवण्यास जो भाग पाडेल तोच खरा पराक्रमी समजावा असे ठरले. प्रथम वाऱ्याने जोराने वाहून ती घोंगडी उडविण्याचा प्रयत्न केला पण थंडी वाजायला लागल्यामुळे वाटसरू ती अधिकच घट्ट धरू लागला. शेवटी वारा दमला. मग सूर्याने आपली प्रखर किरणे वाटसरूच्या अंगावर सोडली. त्यामुळे उकडायला लागून वाटसरूच्या अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्या तेव्हा त्याने ती घोंगडी काढून ठेवली व तो सावलीत जाऊन बसला.

कथा उपदेश : नुसत्या शक्तीचा काहीच उपयोग होत नाही.

## : SMS :

Why are American names like Jackson, Wilson, Markson, Robinson, Kenson, Anderson, Davison, Jemson?
So that mom can remember who is whose son.

## आजचे राशिभविष्य



**मेष :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा:उत्तर समाजात, कुटुंबात सन्मान मिळेल. नवीन योजना फायदेशीर राहतील.

**वृषभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:पश्चिम व्यापारात अडचणी येतील. मुले, भाऊ यांच्याशी मतभेद होतील.

**मिथुन :** शुभ रंग,पांढरा शुभ दिशा: उत्तर जीवनसाथीच्या आरोग्याची चिंता राहील. आर्थिक उत्पन्नाच्या बाबतीत असमाधानी रहाल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम तणावमुक्त झाल्याने आनंदी रहाल. सुख समृध्दीत वाढ होईल.

**सिंह :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:उत्तर शुभकार्यात भाग घेताल. यश व उत्साह वाढणार आहे. रोजगारात नवीन संधी येऊ शकते.

**कन्या :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: उत्तर कामाचा विस्तार वाढणार आहे. घर, वहान खरेदी करण्याचा योग आहे.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:पश्चिम प्रतिष्ठीत व्यक्तींच्या संबंधाचा फायदा उचला. व्यापारात यश मिळणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम चैन करण्याकडे ओढ राहील. अचानक लाभ होईल किंवा प्रिय व्यक्ति भेटल्यामुळे आनंदी रहाल.

**धनु :** शुभ रंग :पांढरा,शुभ दिशा:उत्तर आर्थिक स्थिती चांगली राहणार आहे. संप क्षेत्रात वाढ होईल. काम करण्याच्या पद्धतीत बदल केला तर फायदेशीर रहाल.

**मकर :** शुभ रंग:पिवळा,शुभ दिशा: उत्तर आपल्या महत्वकांक्षेनुसार सर्व कामे पार पडतील. मन आनंदी राहील. व्यापार व्यवसाय उत्तम राहील.

**कुंभ :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा:दक्षिण प्रयत्न केल्यास चांगले फळ मिळणार आहे. कौटुंबिक वातावरण उत्साहाचे राहील. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन :** शुभ रंग : क्रिम, शुभ दिशा :दक्षिण वाईट सवईंचा त्याग करा. आपले प्रयत्न यशस्वी होतील. व्यापारात नवीन योजनेचा विचार कराल.

## पंचांग




| | |
|---|---|
| १३ एप्रिल २०२६ | २५:०८:५७+ |
| सोमवार | सूर्य:मीन |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:कुम्भ०३:४४:२५ |
| चैत्रशके संवत्– १९४८ | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्सर –पराभवनाम | मुस्लिम मास – शव्वाल |
| अयन– उत्तरायणारंभ | तारीख – २४ |
| मास– चैत्र | विशेष |
| ऋतु– सौर वसंत | वरुथिनी एकादशी |
| कृष्ण पक्ष | श्री वल्लभाचार्य जयंती |
| तिथि:एकादशी | रेडासमाधी उत्सव |
| २५:०८:५७+ | – आले (जुन्नर) |
| नक्षत्र:धनिष्ठा १६:०३:२२ | काळभैरव यात्रा – सोनारी |
| योग:शुभ १७:१६:११ | पारंडा (धाराशिव) |
| करण:बव १३:१९:०८ | |
| करण:बालव | |

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७ | २४ |
| अहमदनगर | ३६.७ | २३.२ |
| अकोला | ३८.४ | २५.१ |
| अमरावती | ३६.७ | २२.९ |
| बीड | ३८.३ | २४.७ |
| भंडारा | ३७.४ | २४.९ |
| बुलढाणा | ३१.४ | १८.७ |
| चंद्रपूर | ३८.६ | २७.१ |
| चेन्नई | ४३.२ | ३२.३ |
| नवी दिल्ली | ३०.४ | १९.८ |
| धुळे | ३५.९ | २३.१ |
| गोंदिया | ३५.४ | २१.५ |
| जळगाव | ३८.५ | २२.९ |
| कोल्हापूर | ३७.८ | २३ |
| लातूर | ३६.८ | २४.६ |
| मुंबई | ३७.९ | ३१.५ |
| नागपूर | ३५.७ | २३.७ |
| नांदेड | ३९ | २६.१ |
| नंदूरबार | ३४.९ | २५.७ |
| नाशिक | ३६.९ | २१.३ |
| पुणे | ३६.५ | २२.४ |
| पंढरपूर | ३९.६ | २५.७ |
| सातारा | ३८ | २२.३ |
| सांगली | ३९.२ | २५.४ |
| सोलापूर | ३९.९ | २८.६ |
| वर्धा | ३६.६ | २४.९ |

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९१७



**आडवे शब्द**

१. उन्नती
४. केळ्यांचे मिष्टान्न
७. नभ
१०. प्रेमक्रीडा
११. अग्नी
१३. मच्छर
१५. वस्त्र
१७. ब्रेड
१८. सुनिल --- -- माजी क्रिकेटवीर
२०. बिस्कीटांचा एख अधिक तूप घालून केला जाणारा प्रकार
२४. पंढरपूरच्या विठ्ठलाचा पुजारी
२७. दुबळा
३१. वजन मोजण्याचे साधन
३४. डाळ–तांदळाचा दाक्षिणात्य पदार्थ
३६. दडपण
३७. कदर
३९. आदराने मस्तक झुकवलेला
४०. वर्ष
४१. विश्वेश्वाराची नगरी
४३. मोठी वाटी
४५. मुक्काम
४८. आवड
५०. व्यवस्था
५३. पुष्कळ
५५. निर्धन
५८. गुंड
५९. परागकण
६०. सहाय्य
६१. गोदाम
६२. सुगरण पक्ष्याचे घरटे
६३. प्रकट, उघडपणे
६४. वेल
६५. असहाय्य, निरुपाय
६७. केवळ
६८. सुंदर तरुणी
६९. मिरवणूक
७१. लाल गराचा गोड कंद
७२. मैत्रीण
७३. जंगली
७५. कमी वेळात
७८. ताणल्यास तुटणारे
८०. गवतासारखी पाने असलेली भाजी
८१. जवळच्या भागात
८३. पंख
८४. डिंकाला पर्याय
८५. संपत्ती
८६. बासरी
८७. एक देशी खेळ
८८. कसदार
९०. तुकारामांना त्रास देणारा
९२. चार्ली ---- जगभर गाजलेला अभिनेता
९३. रेषा, रेघ
९४. मध्यस्थी निर्णय करणारी यंत्रणा

**उभे शब्द**

१. ओंकार
२. दया
३. विचार
५. सुळका
६. जीभ, चव
८. गायक
९. नाडी
१०. विद्यापीठातील 'रीडर'
११. अवकाश, वेळ
१२. शैली
१४. अशी दृष्टी म्हणजे छिद्रान्वेषी
१६. हमखास
१९. कसाबसा, कष्टपूर्वक
२१. नलिका
२२. जप्ती
२३. पितामह
२५. वायू
२६. मधुर
२८. कामदेव
२९. गोळा
३०. चरबी
३२. निबर
३३. प्रभाव, सत्ता
३४. येथे
३५. चमत्कार
३८. जाडसर दळलेला गहू
४०. जाळीदार
४२. रक्तवाहिनी
४४. गुणांची पारख नसलेला
४६. नृप, ४७. अस्तनी
४९. नगण्य, ५१. विद्युत
५२. पावलांचा आवाज
५४. शांतता
५६. दुखावलेला
५७. आश्चर्य, ६०. पृथ्वी
६३. मुद्दाम, ६४. वाईट सवय
६५. डच्चू, ६६. बगळा
७०. दानव
७२. माळ, बरोबरी
७४. महिना, ७६. नवरदेव
७७. राखण, ७९. वटवट
८१. हुकूम, ८२. पाठबळ
८६. पातक
८८. मित्र
८९. टोचणी
९०. सावकाश
९१. विजय, सरशी

**जम्बो शब्दकोडे क्र. ९१६ चे उत्तर**

आडवे उत्तर : ३.आस ५. मुबलक ८.अटक ११.विठ्ठला तू वेडा कुंभार १३.वदनी कवळ १४.दहाडे १६.रमी १९.विलाप २४.लतामंडप २५.क्षमा २७.कपाळकरंटा २८.छान २९.रीळ ३०.नक्षा ३१.गलबत ३२.भास ३३.पिनाक ३५.वाटा ३६.द्विज ३८.पुरेसा ३९.लगट ४२.कष्ट ४३.इतरत्र ४५.राजहट्ट ४८.सुवर्ण ५०.चक्षु ५१.फी ५२.कसब ५४.धार ५५.खोट ५६.सबंध ५७.अवतरण ५८.कथा ५९.कर्ण ६०.खेटर ६२.पर ६३.मान ६४.बाळकडू ६६.सार्व ६७.राणीवसा ६९.बाजा ७०.पातक ७२.अनभिज्ञ ७३.म्हातारचळ ७५.पर्जन्य ७६.नवनीत ७७.कटी ७८.शिताफी

उभे उत्तर : १.सविस्तार २.तलाव ३.आवेश ४.सडा ५.मुभा ६.बरड ७.कवळी ८.अनीता ९.टक १०.कवन १२.कुंचला १५.हाड १७.मीलन १८.अमंगल १९.विपरीत २१.उपासना २२.शिकस्त २३.आटापिटा २६.मानसपुत्र २८.छात्र ३१.गजकर्ण ३१अ.बत्ती ३३.पिसारा ३४.कलह ३५.वाट ३७.शांत ४०.गट्ट करणे ४१.वसुधा ४३.इक्षु ४४.रक्तबंबाळ ४६.जलावरण ४७.लांब ४९.वरकरणी ५०.चटकन ५३.सण ५७.अट ६०.खेडूत ६१.सर्वज्ञ ६२.पराधीन ६३.मासा ६४.बाजार ६५.कपाळ ६६.साभिनय ६८.वहिनी ६९.बाताड्या ७१.कपटी ७२.अन्य ७४.चर्म

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य; रिक्षाचालकाला अटक

पुणे (दैनिक संध्या) : शाळकरी मुलीशी अश्लील कृत्य करून पसार झालेल्या रिक्षाचालकाला हडपसर पोलिसांनी अटक केली. त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी 24 तासांत न्यायालयात आरोपपत्र देखील दाखल केले. युनूस गफार खान (वय 55, रा. कोंढवा) असे अटक करण्यात आलेल्या रिक्षाचालकाचे नाव आहे. याबाबत एका शाळकरी मुलीने हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तिने दिलेल्या फिर्यादीनुसार, खान याच्याविरुद्ध बालकांचे लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण अधिनियमान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला. पीडित 11 वर्षीय शाळकरी मुलगी शाळेतून घरी निघाली होती. त्या वेळी रिक्षाचालक खान याने मुलीशी अश्लील कृत्य केले. घाबरलेल्या मुलीने याबाबत पोलिसांकडे तक्रार दिली. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर खान पसार झाला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध घेतला. खान याला अटक करण्यात आल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले. या गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलिसांनी तपास करून आवश्यक ते पुरावे संकलित करून त्याच्याविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी 24 तासांत आरोपपत्र दाखल केले. परिमंडळ सहाचे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे, सहायक आयुक्त अतुलकुमार नवगिरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मोगले, नीलेश जगदाळे, सहायक पोलिस निरीक्षक विनोद साने, दत्तात्रय खेडेकर, कानेकर यांनी ही कारवाई केली.

### काम घटलं, मानधन कमी; पडद्यामागे घाम गाळणाऱ्यांचे काय?

पुणे (दैनिक संध्या) : पूर्वी कसं रोज दोन ते तीन नाटकांच्या जाहिरातींचे फलक तयार करायचो. पण, आता शनिवारी अन् रविवारीच काम मिळतं... बायको गृहिणी आहे. मुलगा ऑफिस बॉय म्हणून एका ठिकाणी नोकरी करता. पण, त्याला जेमतेम 10 ते 12 हजार रुपये मिळतात अन् मला मिळणारं मानधनही तितकचं... मग, महिन्याला मिळणाऱ्या 20 ते 22 हजारांत तिघाचं जगणं कसं भागवायचं तुम्ही सांगा. काटकसर करावी लागते. फ्लेक्स युगामुळे कामं कमी, मानधन कमी झालंय... काय करणार? दुसरं काम करणं या वयात मला शक्य नाही, अनेक संकटं आहेत. पण, कसं तरी आयुष्य आम्ही चालवतोय, अशी कहाणी आहे नाटकांचे जाहिरात फलक तयार करणाऱ्या बाळकृष्ण कलाल यांची. ज्या निष्ठेने नाट्यकलेसाठी त्यांनी आयुष्य वेचले. त्याच नाट्यकलेतून त्यांना मिळणारे मानधन आज कमी झाले आहे. त्यामुळेच फक्त बाळकृष्ण कलालच नव्हे तर त्यांच्यासारखे कित्येक पडद्यामागील कलाकार आर्थिक संकटात आहे. सेट उभारणारे, प्रकाशयोजना करणारे, साऊंड ऑपरेटर, रंगभूषाकार, नाटकांच्या जाहिरातींसाठी फलक तयार करणारे, अशा सर्वांच्या कष्टावरच नाटक उभं राहतं. मात्र, काळाच्या ओघात या पडद्यामागील कलाकारांच्या वाट्याला कामाची कमतरता आणि अपुरे मानधन, असे दुहेरी संकट आले आहे. पूर्वी आठवडाभर चालणारे नाट्यप्रयोग आता शुक्रवार, शनिवार आणि रविवारपुरते मर्यादित झाले आहेत. परिणामी महिन्याला मिळणाऱ्या कामात मोठी घट झाली आहे. पुण्यात सुमारे 30 ते 40 पडद्यामागील कलाकार कार्यरत असून, प्रत्येक नाट्यप्रयोगामागे त्यांना सध्या फक्त 700 ते 1000 रुपये मानधन मिळत आहे. आमच्या कलेला योग्य मानधन आणि सातत्यपूर्ण कामाच्या संधी मिळाल्या पाहिजेत, अशी मागणी कलाकारांकडून केली जात आहे. गेल्या 43 वर्षांपासून सेट डिझाईनचे काम करणारे दत्तात्रय शिंदे सांगतात, या कामाने कुटुंबाला आधार दिला. पूर्वी खूप काम मिळायचे. कुटुंबाचा खर्च भागायचा. पण, आता हाताला कामं कमी आहेत. मिळणाऱ्या मानधनात महिन्याचा खर्च भागत नाही. दुसरे काम शोधावे लागते; मात्र, तिथेही कमी काम अशी स्थिती आहे. आज काम आहे, उद्या नाही, अशी चिंता वाटते. ही माझीच कहाणी नाहीतर प्रत्येक पडद्यामागील कलाकाराची आहे. बालगंधर्व रंगमंदिर पाडण्याची चर्चा ऐकली. या नाट्यगृहाशी आमच्या भावना जोडलेल्या आहेत. येथेच सर्वाधिक प्रयोग होतात आणि आम्हाला काम मिळते. कृपया हे नाट्यगृह पाडू नये. नेपथ्याचे काम करणाऱ्या सचिन फुलपगार यांनी आजच्या स्थितीत काम कमी आणि मानधनही कमी अशी परिस्थिती आहे, तडजोड करतच घरखर्च भागवावा लागतो.




### पुणे फोटोग्राफर्स असोसिएशनचा 'फोटो फेअर' उत्साहात संपन्न

पुणे (दैनिक संध्या) : पुणे फोटोग्राफर्स अँड व्हिडिओग्राफर्स असोसिएशनच्या १० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित 'फोटो फेअर' आणि 'विशेष गौरव सोहळा' पुण्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या प्रदर्शनातून फोटोग्राफी क्षेत्रातील जागतिक स्तरावरील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अनुभव पुणेकर फोटोग्राफर्सना एकाच छताखाली घेता आला. प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवर कांजी भाई आणि सोनीचे अभिजीत यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. या फेअरमध्ये निकॉन, कॅनन, लुमिक्स, फ्युजी, एचपी, डिजिटेक आणि गोडॉक्स यांसारख्या नामांकित ब्रँड्ससह फोटो लॅब व कॅमेरा उपकरणांचे एकूण १८ स्टॉल्स उभारण्यात आले होते. पुण्यातील ६०० हून अधिक फोटोग्राफर्सनी प्रदर्शनाला भेट देत नवीन कॅमेरे, लेन्सेस आणि लाइटिंग तंत्रज्ञानाची माहिती घेतली. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे कॅमेरा रिपेअर तज्ज्ञांचा विशेष सत्कार. "ज्याप्रमाणे डॉक्टर मानवी शरीराची काळजी घेतात, त्याचप्रमाणे फोटोग्राफरच्या कॅमेऱ्याला जीवदान देण्याचे काम रिपेअरिंग तज्ज्ञ करतात," अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते पुण्यातील सात प्रमुख कॅमेरा रिपेअर तज्ज्ञांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. या सोहळ्यासाठी अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध इंडस्ट्रियल फोटोग्राफर विश्वास सोरटे उपस्थित होते. तसेच, असोसिएशनतर्फे आयोजित फोटोग्राफी स्पर्धांमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरवण्यात आले. दहा वर्षांच्या यशस्वी वाटचालीनिमित्त आणि या उपक्रमाच्या यशाबद्दल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व सदस्यांचे आभार मानले.

# लघुपट, वेब सीरिज, अल्बम क्षेत्रातही 'एआय'ची एंट्री

## तरुणाईकडून सध्या लघुपट, वेब सीरिज अन् म्युझिक अल्बमची निर्मिती वाढली


**पुणे (दै. संध्या)**

'एआय टूल्स वापरून होणारे लघुपटांचे एडिटिंग, वेबसीरिजच्या जाहिरातींसाठी काही मिनिटांत तयार होणारे आकर्षक पोस्टर्स आणि म्युझिक अल्बममध्ये 'एआय'च्या साहाय्याने तयार केलेल्या दृश्यांचा वापर... सध्या मनोरंजन क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेची (एआय) जोरदार एन्ट्री झाली असून, लघुपट, वेब सीरिज आणि म्युझिक अल्बम या तिन्ही क्षेत्रांतही 'एआय'ची क्रांती पाहायला मिळत आहे. या क्षेत्रात 'एआय' हे फक्त तंत्रज्ञानापुरते मर्यादित न राहता 'क्रिएटिव्ह पार्टनर' म्हणून समोर येत आहे.

लघुपट, वेब सीरिज आणि म्युझिक अल्बमची निर्मिती करणाऱ्या तरुणांकडून 'एआय'चा मोठ्या प्रमाणात वापर केला जात आहे. वेळ आणि खर्चाची बचत, सर्जनशीलतेला चालना, उच्च दर्जाचे व्हिज्युअल्स-साउंड इफेक्ट्स, डबिंग, सबटायटल्स आणि भाषांतर प्रक्रिया अधिक सुलभ होणे, असे कित्येक फायदे 'एआय'मुळे होत आहेत. तरुणाईकडून सध्या लघुपट, वेब सीरिज अन् म्युझिक अल्बमची निर्मिती वाढली आहे.

काळ बदलताना आता या क्षेत्रात तंत्रज्ञानाचाही मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. लघुपट आणि वेब सीरिजचे पोस्टर असो, टीझर तयार करण्यासाठी 'एआय' तंत्रज्ञान वापरले जात आहे. लघुपटांच्या क्षेत्रात 'एआय'चा वापर संहितालेखनापासून एडिटिंगपर्यंत होताना दिसत आहे.

काही मिनिटांत कथा, संवाद आणि दृश्यांची रूपरेषा तयार करणारी एआय टूल्स आता सहज उपलब्ध झाली आहेत. व्हिज्युअल इफेक्ट्स, रंगसंगती आणि साउंड इफेक्टसाठी एआय तंत्रज्ञान वापरले जात आहे. काही तरुण निर्माते 'एआय'च्या मदतीने संपूर्ण लघुपट




तयार करण्याचे धाडसी प्रयोग करीत आहेत.

'वेब सीरिज'च्या जगातही 'एआय'चा वापर होत आहे. प्रेक्षकांच्या आवडी - निवडी, पाहण्याच्या सवयी आणि ट्रेंड्स यांचा अभ्यास करून एआय निर्मात्यांना कोणती कथा अधिक लोकप्रिय ठरेल, याचा अंदाज देत आहे. त्याचबरोबर डबिंग, सबटायटल्स, भाषांतर आणि जाहिरातीसाठींचे पोस्टर्स तयार करण्यासाठी 'एआय'चा मोठ्या प्रमाणावर वापर होत आहे. यामुळे मराठीसह इतर प्रादेशिक भाषांमधील वेब सीरिजसाठी एआय तंत्रज्ञान वापरले जात आहे.

म्युझिक अल्बमच्या क्षेत्रात 'एआय'ने दृश्य सादरीकरणाचा चेहरामोहरा बदलला आहे. गाण्यांनुसार एआयद्वारे तयार केलेली दृश्ये, लोकेशन्स आणि ॲनिमेशनचा वापर वाढला आहे. म्युझिक अल्बममधील संगीतासाठी 'एआय'चा वापर होत आहे. याविषयी अजय नाईक सांगतात की, म्युझिक अल्बममध्ये विविध लोकेशन्स दाखविण्यासाठी 'एआय तंत्रज्ञान' वापरले जात आहे. म्युझिक अल्बममध्ये यामुळे दृश्य सादरीकरण अधिक प्रभावी झाले आहे. अनेक तरुण निर्माते-दिग्दर्शकांकडून लघुपटनिर्मितीसाठी 'एआय' तंत्रज्ञान वापरले जात आहे. संहितालेखन, एडिटिंग आणि पोस्टर तयार करण्यासाठी आम्हीही 'एआय'चा वापर केला असून, त्यामुळे लघुपट अधिक प्रभावी बनला आहे. भविष्यात एआयमुळे लघुपट नक्कीच जागतिक स्तरावर पोहचतील.

# पुण्यात रिक्षा मीटर विरुद्ध ॲप दर वाद चिघळला; संघटनांचा आक्रमक पवित्रा

## ॲप्समुळे मीटरचा वापर घटल्याचा आरोप; मीटर बंधनकारक करण्याची मागणी

**पुणे (दै. संध्या)**

शहरातील रिक्षा व्यवसायाला सध्या ऑनलाइन ॲप्सचा विळखा पडला असून, शासनाने अनिवार्य केलेले रिक्षामीटर आता केवळ नावापुरतेच उरलेत काय, असा संतप्त सवाल रिक्षाचालक आणि संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केला. सुमारे 85 ते 95 टक्के व्यवसाय ॲपद्वारे होत असल्याने मीटरचा वापर बऱ्यापैकी थांबल्याचे सांगत, रिक्षाचालक आणि संघटनांनी याविरोधात आक्रमक पवित्रा घेतल्याचे बुधवारी (दि. 8) बोलताना सांगितले.



मीटर पासिंगसाठी खर्च करूनही त्याचा वापर होत नसेल, तर ही शासनाची चेष्टा आहे. फक्त रिक्षाच नव्हे, तर टॅक्सीचीही हीच अवस्था आहे. सरकारने तातडीने अभ्यासपूर्ण समिती नेमून यावर तोडगा काढावा, असे मतही या वेळी रिक्षाचालक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी बोलताना व्यक्त केले. रिक्षाचालक अनंता वीर म्हणाले, मीटरप्रमाणेच सेवा पुरवणे रिक्षाचालकांचे कर्तव्य आहे.पुणे आरटीए कमिटीने पहिल्या 1.5 कि.मी. साठी 25 रुपये आणि त्यानंतर प्रति कि.मी. 17 रुपये असा दर निश्चित केला आहे.

ॲप कंपन्यांना हा दर बदलण्याचा कोणताही अधिकार नाही. रिक्षा व्यवसायाची ओळख असलेल्या मीटरची जागा आता मोबाईल ॲप्सनी घेतली आहे. पूर्वी मीटर दरवाढीसाठी आंदोलने व्हायची. मात्र, आता ॲप कंपन्यांचे दर ठरवण्याचे अधिकार शासनाकडे उरले नाहीत. कंपन्या मनाप्रमाणे दर ठरवत आहेत. आरटीए (रिजनल ट्रान्सपोर्ट ॲथोरिटी)ने ठरवलेल्या दराकडे सर्रासपणे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे प्रवासी आणि रिक्षाचालकांमध्ये वाद होत आहेत, हे थांबविण्यासाठी रिक्षा मीटरचा वापर बंधनकारक करणे आवश्यक आहे. ऑनलाइन सेवा देणाऱ्या कोणत्याही कंपनीने अद्याप कायदेशीर ॲग्रागिटर परवानगी घेतलेली नाही. त्यामुळे त्यांचे दर अनिश्चित आहेत. रिक्षाला मीटर असल्यामुळे चालकांनी मीटरनेच व्यवसाय करणे कायदेशीर आणि हिताचे आहे. पुणे आरटीए कमिटीने पहिल्या 1.5 कि.मी. साठी 25 रुपये आणि त्यानंतर प्रति कि.मी. 17 रुपये असा दर निश्चित केला आहे. ॲप कंपन्यांना हा दर बदलण्याचा कोणताही अधिकार नाही. संघटनेचे सभासद आजही मीटरचाच वापर करतात. रिक्षा स्टँडवरून प्रवाशांना सेवा देताना मीटरचा वापर करणे, ही एक शिस्त आहे. सर्वांनी मीटरचा वापर केल्यास ॲप कंपन्यांची मनमानी संपेल.

# स्वारगेट मेट्रोसमोर अपघात; बसच्या धडकेत पादचारी ठार

**पुणे (दै. संध्या)**

रस्ता ओलांडत असताना एका पादचाऱ्याचा पीएमपी बसच्या मागील चाकाखाली सापडून जागीच मृत्यू झाला. ही घटना स्वारगेट मेट्रो स्टेशनसमोर गुरुवारी (दि.९) रात्रीच्या वेळी घडली. अपघाताची माहिती मिळताच स्वारगेट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. रात्री उशिरापर्यंत मृताची ओळख पटवण्याचे काम सुरू होते.

मिळालेल्या माहितीनुसार, कात्रजहून कोथरूडच्या दिशेने जाणारी पीएमपी बस स्वारगेट चौकातून जात होती. त्यावेळी मेट्रो स्टेशन समोरून एक पादचारी रस्ता ओलांडत असताना अचानक बसच्या मागील चाकाखाली आला. हा अपघात इतका भीषण होता की, त्या व्यक्तीचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच स्वारगेट पोलीस ठाण्याचे वरिष्ट पोलीस निरीक्षक यशवंत निकम आणि पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.




पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला असून, रात्री उशिरापर्यंत संबंधित व्यक्तीची ओळख पटवण्याचे काम सुरू होते. पादचारी रस्ता ओलांडताना अचानक पळत आल्यामुळे हा अपघात घडला, असा दावा बस चालकाने केला आहे.

मात्र, अपघाताचे नेमके कारण शोधण्यासाठी स्वारगेट पोलीस परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे चित्रीकरण तपासत आहेत. रात्री उशिरापर्यंत या प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# टँकरचालक आणखी किती निष्पापांचे बळी घेणार?

**पुणे (दै. संध्या)**

तहानलेल्या लोकांना पाण्याचे टँकर घेऊन जातायत की निष्पाप लोकांचे बळी घेण्यासाठी टँकरचालक बाहेर पडताहेत? आठवडाभरात वानवडी - कोंढवा परिसरात टँकरचालकांनी एकापाठोपाठ लोकांना चिरडून टाकले. ऐन उमेदीच्या बहरात हे लोक गेल्यामुळे त्यांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली आहेत.

एवढा भीषण प्रकार घडून देखील प्रशासनाकडून टँकर चालकांवर वचक बसवली जात नाही. प्रादेशिक परिवहन कार्यालय व वाहतूक पोलिस झोपा काढत आहे का? असा संतप्त सवाल नागरिक करीत आहेत. कोंढवा, वानवडी, महंमदवाडी परिसरात पाण्याच्या टँकरची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. बारमाही या भागातील टँकर चालूच असतात. उन्हाळा म्हणजे पाण्याच्या टँकरची संख्या जास्त पाहायला मिळते. रात्रंदिवस जास्तीत जास्त ट्रिप, फेऱ्या मारण्यासाठी टँकरचालकांची चढाओढ लागली जाते. अशा या घाईतच त्यांना रस्त्याने जाणारी निष्पाप व्यक्ती दिसत नाही. टँकरमालकाला, पाणी विकणाऱ्यांना व टँकरचालकांना फक्त पैसा हवा आहे.

# खासगी क्लासच्या ऑफिस बॉयचा विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार; व्हिडीओ चित्रीकरणही केले

**पुणे (दै. संध्या)**

खासगी शिकवणीच्या कार्यालयात काम करणाऱ्या एका ऑफिस बॉयने बारा वर्षांच्या विद्यार्थी मुलावर लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी आरोपी ऑफिस बॉयला पोलिसांनी अटक केली असून, त्याच्यावर बाललैंगिक अत्याचार कायद्यानुसार (पोक्सो) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विकास दिलीप गायकवाड (वय 35, मूळ रा. हराळवाडी, सोलापूर) असे आरोपी ऑफिस बॉयचे नाव आहे. याप्रकरणी 45 वर्षीय व्यक्तीने मार्केट यार्ड पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादींचा मुलगा इयत्ता 8 वीमध्ये शिकत असून, तो एका खासगी शिकवणीला जातो. गेल्या चार-पाच दिवसांपूर्वी रात्री साडेदहाच्या सुमारास जेवण झाल्यानंतर तो वडिलांना म्हणाला, 'उद्या शाळेत जाणार नाही.' वडील त्याला म्हणाले, 'तू अनेकदा सुट्टी मारतो.



तुला शाळेत जायला हवे.' त्या वेळी मुलगा रडायला लागला. वडिलांनी विश्वासात घेऊन त्याला विचारले असता त्याने विकासच्या कृत्याची माहिती दिली. विकास हा डिसेंबर 2025 पासून मुलावर लैंगिक अत्याचार करीत होता.

एवढेच नव्हे, तर आरोपीने मुलाचे फोटो काढून त्याला मानसिक त्रास दिला. त्यानंतर वडिलांनी क्लासमध्ये जाऊन माहिती घेतल्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपी गायकवाडला अटक केली असून, पुढील तपास मार्केट यार्ड पोलिस करीत आहेत.

# १५% पाणीकपात; कमी पावसाच्या इशाऱ्यानंतर आदेश

## खडकवासला प्रकल्पातील पाणी जपण्यासाठी निर्णय; टंचाई टाळण्यासाठी आत्तापासून नियोजन सुरू

**पुणे (दै. संध्या)**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहील, असा अंदाज वर्तविला आहे. ही बाब लक्षात घेऊन खडकवासला प्रकल्पातील उपलब्ध पाणीसाठा 31 जुलैपर्यंत कसा पुरविता येईल, याचे नियोजन करावे लागणार आहे. परिणामी, पुणे महापालिकेने आत्तापासूनच महिन्याला उचलल्या जाणाऱ्या पाणीकोट्यात 15 टक्के कपात करावी, असे आदेश जलसंपदा




विभागाने दिले आहेत.

अशाच सूचना पिंपरी-चिंचवड महापालिका आणि एमआयडीसी या विभागांना देखील केलेल्या आहेत. भारतीय हवामानशास्त्र विभागाने यंदाच्या मान्सूनवर 'अल निनो' व 'आयओडी'चा प्रभाव असल्याने पर्जन्यमान कमी राहण्याचा इशारा दिला आहे.

याबाबत नुकत्याच संपलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यानुसार पाण्याचे नियोजन करावे, अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे कृष्णा व गोदावरी खोऱ्यातील उपलब्ध पाणीसाठ्याच्या काटेकोर वापरासंदर्भात जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सूचना दिल्या आहेत. त्यानुसार खडकवासला विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी महापालिकेला याबाबत महिन्याच्या उचलण्यात येणाऱ्या पाणीकोट्यात 15 टक्के पाणीकपात करण्याचे निर्देश दिले आहेत. धरणातील उपलब्ध पाणीसाठा आणि भविष्यात अवर्षणप्रवण परिस्थिती निर्माण झाल्यास आत्तापासूनच पेयजलाचे नियोजन करणे गरजेचे आहे.

जेणेकरून 31 जुलैपर्यंत पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे शक्य होईल आणि पाणीटंचाईचा सामना करावा लागणार नाही. त्यासाठी पिण्याच्या पाण्याचे आपल्या स्तरावर योग्य ते नियोजन करावे, असेही देशमुख यांनी महापालिकेला पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### अंजनगाव पुतळा प्रकरणात पोलिसांची मोठी कारवाई, शासकीय कामात अडथळा

माढा (दैनिक संध्या) : माढा तालुक्यातील अंजनगाव पुतळा प्रकरणात पोलिसांनी आणखी एक मोठी कारवाई केली आहे. अंजनगावला पुतळा पाठवणाऱ्या बाळराजे आवारेचा जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील कारखाना पोलिसांनी सील केला होता. तसेच या प्रकरणात आतापर्यंत आठ गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. तर आता या प्रकरणी 6 आरोपींना अटक करण्यात आली आहे. माढा तालुक्यातील अंजनगाव पुतळा प्रकरणात शासकीय कामात अडथळा आणल्या प्रकरणी 6 आरोपींना अटक करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, अंजनगाव येथे जमिनीची मोजणी करण्यासाठी आलेल्या अधिकाऱ्यांना कामात अडथळा आणल्याप्रकरणी हि अटक करण्यात आली आहे. ओबीसी नेते लक्ष्मण हाके आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्यातील हाके यांचे सहकारी शिवम वाघमोडे, बाळू वाघमोडे, सतीश वाघमोडे, बंडू वाघमोडे, अरुण वाघमोडे, नितीन वाघमोडे यांना पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी अटक केलेले सर्व आरोपी हे अंजनगाव येथील स्थानिक ग्रामस्थ आहेत, अशी देखील माहिती आहे. दरम्यान, पोलिसांवर दगडफेक केल्याप्रकरणी या आधीच 12 आरोपींना पोलिसांनी अटक केली असून त्यातील 10 जण अजूनही न्यायालयीन कोठडीत आहेत. मौजे अंजनगाव तालुका माढा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसवल्याप्रकरणी दिनांक 1 एप्रिल 2026 रोजी पासून गावामध्ये तणाव निर्माण झाला होता. गावातील दोन्ही समाज एकमेकांसमोर आंदोलनाकरिता बसले होते. अशावेळी प्रशासनाने जागेची मोजणी करून घेण्याबाबत समन्वयाने तोडगा काढला होता. परंतु मोजणी करताना मोजणी अधिकारी यांच्या कामात हस्तक्षेप करून कामात अडथळा आणल्या प्रकरणी आरोपींना अटक करण्यात आली आहे.



### भीषण अपघात! विरुद्ध दिशेने येणाऱ्या हायवा ट्रकने शाळेत जाणाऱ्या शिक्षिकेला उडवलं

मुंबई (दैनिक संध्या) : मुंबईच्या विरारमध्ये अपघाताची एक दुर्दैवी घटना घडली आहे. मुंबई–अहमदाबाद महामार्गावरील शिरसाड नाका येथे शनिवारी सकाळी झालेल्या भीषण अपघातात शाळेत जाणाऱ्या एका शिक्षिकेचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, स्वीडल गोम्स (वय 40, रा. निर्मळ) या तिल्हेर येथील मस्कर पाडा जिल्हा परिषद शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत होत्या. त्या शनिवारी सकाळी शाळेकडे जात असताना शिरसाड नाका येथे बसस्टॉपकडे जाण्यासाठी रस्ता ओलांडत होत्या. त्यावेळी विरुद्ध दिशेने येणाऱ्या हायवा ट्रकने त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. दरम्यान, हि धडक इतकी भीषण होती कि, या धडकेत ट्रकचा टायर अंगावरून गेल्याने स्वीडल गोम्स यांचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर संबंधित हायवा ट्रक चालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे. घटनेची माहिती मिळताच मांडवी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह ताब्यात घेऊन रुग्णवाहिकेद्वारे शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत असून ट्रक चालकाचा शोध घेत आहे. मात्र या दुर्दैवी घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. या अपघाताची बातमी कळताच परिसरात तसेच तिल्हेर जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी व पालक वर्गात शोककळा पसरली आहे. दरम्यान, महामार्गावर हायवा ट्रकद्वारे क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक, वेगमर्यादेचे उल्लंघन आणि चालकांचे प्रशिक्षण याबाबत प्रशासनाने कठोर पावले उचलण्याची मागणी स्थानिकांकडून करण्यात येत आहे.

### नांदेडमध्ये पोलिसांचं कॉम्बिग ऑपेरेशन, तब्बल 43 तलवारी पकडल्या, एकाला अटक

नांदेड (दैनिक संध्या) : नांदेडमध्ये पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. कॉम्बिग ऑपेरेशनमध्ये नांदेड पोलिसांची 43 तलवार पकडल्या आहेत. या प्रकरणी एकाला अटक देखील करण्यात आली आहे. नांदेडमध्ये 5 खून झाल्या नंतर पोलीस ॲक्टिव्ह मोडवर आले आहेत. आतापर्यंत 100 च्या वर कुख्यात गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पुरुषोतम सिंग ग्रंथी असे नांदेड पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. 31 तलवारी, खंजर 2 चाकू 10 असे 4 लाख 28 हजार रुपयांचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला.



### नाशिक भूषण पुरस्कार सोहळा संपन्न; महिला व युवा उद्योजकांचा गौरव

पुणे (दैनिक संध्या) : आनंदी युनिव्हर्स फाउंडेशन यांच्या वतीने आयोजित "नाशिक भूषण पुरस्कार सोहळा 2026" हा उपक्रम नाशिक येथे मोठ्या उत्साहात आणि दिमाखात पार पडला. हा सोहळा विशेषतः महिला उद्योजक आणि युवा उद्योजकांना प्रोत्साहन देणारा प्रेरणादायी उत्सव ठरला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून मराठी चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री स्वरा राजपूत यांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष आकर्षण प्राप्त झाले आणि उपस्थितांना प्रेरणा मिळाली. संस्थेचे अध्यक्ष व कार्यक्रमाचे मुख्य संयोजक गणेश रामदास विटकर यांच्या नेतृत्वाखाली हा भव्य सोहळा यशस्वीरीत्या पार पडला. यावेळी गोदा इंटरटेनमेंटचे दिलीप जाधव, सुप्रसिद्ध निवेदक गणेश मोढवे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उद्योजक, कृषी तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात महिला उद्योजकांनी व्यवसाय क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा विशेष गौरव करण्यात आला. घर आणि व्यवसाय यांचा समतोल साधत त्यांनी मिळवलेले यश हे समाजासाठी प्रेरणादायी ठरले.

# डिझेल आणि विमान इंधनावरील निर्यात शुल्कात वाढ

## बदलत्या जागतिक ऊर्जा परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी निर्णय

नवी दिल्ली (दै. संध्या) :

केंद्र सरकारने डिझेलवरील निर्यात शुल्क वाढवून ५५.५ रुपये प्रति लिटर, तर विमान इंधनावरील वरील शुल्क ४२ रुपये प्रति लिटर केले. मात्र, पेट्रोलवरील शुल्क कायम आहे, यामध्ये कोणतीही वाढ सरकारने केली नाही. केंद्रीय अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या राजपत्र अधिसूचनेनुसार, केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील निर्यात शुल्कात वाढ केली आहे.



■ पेट्रोलवरील शुल्क कायम

■ तत्काळ प्रभावाने होणार निर्णय लागू

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, "तात्काळ प्रभावाने" लागू होणाऱ्या या निर्णयाचा उद्देश, बदलत्या जागतिक ऊर्जा परिस्थितीच्या पार्श्व भूमीवर देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करणे आणि किमतींमधील तफावतीचा निर्यातदारांना अवाजवी फायदा घेऊ न देणे हा आहे.

सरकारने हाय-स्पीड डिझेलवरील 'रस्ते आणि पायाभूत सुविधा उपकर' देखील वाढवला आहे. या सुधारित रचनेमुळे हाय-स्पीड डिझेलवरील एकूण निर्यात शुल्क प्रभावीपणे वाढून ५५.५ रुपये प्रति लिटर झाले आहे; यापूर्वी हे शुल्क २१.५ रुपये प्रति लिटर होते. त्याचप्रमाणे, सुधारित अधिसूचनेनुसार 'एव्हिएशन टर्बाइन फ्युएल' वरील शुल्क २९.५ रुपये प्रति लिटरवरून वाढवून ४२ रुपये प्रति लिटर करण्यात आले आहे.

# म्हाडाच्या पहाडी गोरेगाव येथील घरे ऑन डिमांड

मुंबई (दै. संध्या) :

म्हाडाच्या लॉटरीमधील पहाडी गोरेगाव येथे असलेल्या अत्यल्प गटातील घरांची किंमत ३२ लाख ३६ हजारांवर आहे. ही घरे प्रधानमंत्री आवास योजनेमधील आहेत, तर लॉटरीमधील इतर ठिकाणी अत्यल्प गटासाठी राखीव असलेल्या घरांसाठीही सर्वाधिक अर्जदारांचे अर्ज येण्याची शक्यता असून, या घरांची किंमत २९ लाखांपासून ५० लाखांवर आहे. पहाडी गोरेगाव येथील घरांना जास्त मागणी असून, यापूर्वीही या घरांकडे अर्जदारांचे अधिक लक्ष होते.

म्हाडाच्या लॉटरीमधील पहाडी गोरेगाव येथे असलेल्या अत्यल्प गटातील घरांची किंमत ३२ लाख ३६ हजारांवर आहे. ही घरे प्रधानमंत्री आवास योजनेमधील आहेत, तर लॉटरीमधील इतर



| सोडतीतील अत्यल्प गटातील घरांची किंमत | |
|---|---|
| विक्रोळी | ४९ लाख |
| पहाडी गोरेगाव | ३२ लाख ३६ हजार |
| वडाळा | ४१ लाख ५१ हजार |
| विक्रोळी | ३५ ते ३८ लाख |
| मानखुर्द | २९ लाख ३७ हजार |
| चांदिवली | २६ लाख ७० हजार |

ठिकाणी अत्यल्प गटासाठी राखीव असलेल्या घरांसाठीही सर्वाधिक अर्जदारांचे अर्ज येण्याची शक्यता असून, या घरांची किंमत २९ लाखांपासून ५० लाखांवर आहे. पहाडी गोरेगाव येथील घरांना जास्त मागणी असून, यापूर्वीही या घरांकडे अर्जदारांचे अधिक लक्ष होते. म्हाडा मुंबई मंडळातर्फे मुंबईतील विविध गृहनिर्माण प्रकल्पांमधील २६४० सदनिकांच्या विक्रीसाठी आयोजित संगणकीय सोडतीकरिता ऑनलाइन अर्ज नोंदणी व अर्ज स्वीकृती प्रक्रियेला ३० मार्च रोजी 'गो लाइव्ह' समारंभाद्वारे प्रारंभ करण्यात आला होता. ९ एप्रिलपर्यंत १२,६५४ अर्ज आले असून, यापैकी ६,५१५ अर्जदारांनी अनामत रक्कम भरली आहे.

अर्जदारांची पात्रता सोडतीच्या आधीच निश्चित होणार असून, या प्रणालीने पात्र ठरविलेले अर्जदारच सोडतीत सहभाग घेऊ शकतील. सोडतीअंतर्गत एकूण ९७ विविध ठिकाणी गृहनिर्माण प्रकल्पांचा समावेश आहे.

## एमएमआरडीला दणका; रिलायन्सला दिलासा

मुंबई (दै. संध्या) :

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडला (आरआयएल) मोठा दिलासा देत मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) २०१७ मध्ये जारी केलेली 'शो-कॉज-कम-डिमांड नोटीस' आणि त्यानंतर २०१९ मध्ये दिलेली १,११६ कोटी रुपयांची नोटीस रद्द केली. ही रक्कम बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स प्रकल्प पूर्ण करण्यात झालेल्या कथित विलंबासाठी अतिरिक्त प्रीमियम म्हणून मागितली होती. न्यायालयाने ही कारवाई मनमानी व दडपशाहीपूर्ण असल्याचे म्हटले.

मुख्य न्या. श्री चंद्रशेखर आणि न्या. सुमन श्याम यांच्या खंडपीठाने नमूद केले की, ही मागणी लीज करारानुसार ग्राह्य धरता येत नाही. बांधकाम पूर्ण करण्यात कथित विलंबासाठी दंड / अतिरिक्त प्रीमियमाची मागणी लीज डीडमधील कलम २ (डी) आणि (ई) अंतर्गत ग्राह्य नाही. शिवाय, एमएमआरडीएने ही रक्कम अत्यंत मनमानी, दडपशाही, अन्यायकारक आणि अवाजवी पद्धतीने, लीज रद्द करण्याची धमकी देऊन व अर्जदारावर अनावश्यक दबाव टाकून वसूल केली. त्यामुळे त्याच्या व्यावसायिक हिताला धोका निर्माण झाला, असे न्यायालयाने नमूद केले. रिलायन्सने ६४६.७७ कोटी रुपये दबावाखाली जमा केली.

रिलायन्सने युक्तिवाद केला की, विलंब त्यांच्या नियंत्रणाबाहेरील कारणांमुळे झाला. उदाहरणार्थ अतिरिक्त एफएसआयच्या काही भागांवर न्यायालयीन स्थगिती, पर्यावरणीय व इतर वैधानिक मंजुरींमध्ये झालेला विलंब, आणि प्रकल्पाची एकात्मिक रचना...त्यामुळे टप्प्याटप्प्याने बांधकाम शक्य नव्हते.

## केमिकल युक्त गुळाच्या मुद्द्यावरून शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये संघर्ष



कोल्हापुर (दै. संध्या) :

केमिकल युक्त कोल्हापुरी गुळाच्या मुद्द्यावरून गूळ उत्पादक शेतकरी आणि व्यापाऱ्यांमध्ये संघर्षाचे चिन्ह निर्माण झाली आहेत. केमिकल युक्त गुळाची जबाबदारी घ्यायची कुणी? असा प्रश्न निर्माण झाल्याने त्याचा परिणाम कोल्हापुरातील गुळ सौद्यांवर होताना दिसत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील बहुतांशी गुऱ्हाळघरे सध्या बंद आहेत. मात्र ज्या गुऱ्हाळमध्ये अजूनही गुळ उत्पादन होत आहे, अशा गुळ उत्पादक शेतकऱ्यांनी आजपासून गुळाचे उत्पादन थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. केमिकल युक्त गोळ्याबाबत व्यापाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट करावी, असं या शेतकऱ्यांचे म्हणणं आहे.

दरम्यान, काही दिवसापूर्वी गुजरातमधील मार्केटमध्ये अन्न औषध प्रशासन विभागाने केलेल्या कारवाईत कोल्हापुरातून निर्यात झालेल्या गुळामध्ये घातक केमिकल आढळून आली होती. या प्रकरणी दोघांवर गुजरातमध्ये गुन्हे देखील दाखल झालेत. प्रकारानंतर गुजरात मधील व्यापाऱ्यांनी कोल्हापूर आणि सांगली मधील गुळ स्वीकारायला नकार दिला असतानाच आता कोल्हापूर मार्केटमध्ये देखील याच मुद्द्यावरून व्यापारी आणि शेतकऱ्यांमध्ये संघर्ष दिसू लागलाय. दरम्यान केमिकल युक्त गुळासाठी शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी व्यापाऱ्यांना जबाबदार धरलंय.

# जनक्रांती मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षांवर हल्ला

## जळगाव शहरातील गजबजलेल्या रिंग रोड परिसरात प्राणघातक हल्ला

जळगाव (दै. संध्या) :

शहरातील गजबजलेल्या रिंग रोड परिसरात दुपारी जनक्रांती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष मुकुंद सपकाळे यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. दुचाकीवरून आलेल्या टोळक्याने सपकाळे यांची कार अडवून चारही बाजूंनी जोरदार दगडफेक केली. या भीषण हल्ल्यात सपकाळे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून शहरात खळबळ उडाली आहे.

मुकुंद सपकाळे हे आपल्या काही कार्यकर्त्यांसह कारने रिंग रोड परिसरातून जात होते. यावेळी दुचाकीवर आलेल्या काही तरुणांनी त्यांची गाडी अडवली आणि काही कळण्याच्या आतच वाहनावर दगडांचा वर्षाव सुरू केला. हल्लेखोरांनी इतक्या जोराने दगडफेक केली की कारच्या काचा फुटून सपकाळे यांच्या डोक्याला गंभीर जखम झाली. हल्ल्यानंतर सपकाळे यांनी स्वतः जिल्हा पेठ पोलीस ठाणे गाठले. पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांना तात्काळ जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहिती नुसार, हा हल्ला बॅनर छपाईच्या वादातून झाला असल्याचे समोर येत आहे. मुकुंद सपकाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, विशाल अहिरे नावाच्या तरुणासोबत त्यांचा वाद झाला होता. याच वादाचा राग मनात धरून विशालने आपल्या साथीदारांसह हा हल्ला केल्याचा आरोप सपकाळे यांनी केला आहे.

भरदिवसा शहराच्या मुख्य भागात हा हल्ला झाल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज गोळा करण्यास सुरुवात केली आहे. मुख्य संशयित आरोपी विशाल अहिरे आणि त्याच्या साथीदारांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत. जळगावात गेल्या काही दिवसांपासून गुन्हेगारीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने सर्वसामान्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

# मतदान करणे आणि निवडणूक लढवणे हे मूलभूत अधिकार नाहीत, सर्वोच्च न्यायालयाची स्पष्टोक्ती

## निवडणूक लढवण्याचा अधिकार हा पात्रता, अपात्रता आणि संस्थात्मक आवश्यकता यांसारख्या अधिक कडक नियमांच्या अधीन

नवी दिल्ली (दै. संध्या) :

मतदानाचा अधिकार किंवा निवडणूक लढवण्याचा अधिकार यांपैकी कोणताही अधिकार हा 'मूलभूत अधिकार' नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने पुन्हा एकदा स्पष्ट केले. हे दोन्ही अधिकार एकमेकांपेक्षा भिन्न आहेत; शिवाय, निवडणूक लढवण्याचा अधिकार हा पात्रता, अपात्रता आणि संस्थात्मक आवश्यकता यांसारख्या अधिक कडक नियमांच्या अधीन असतो, असे न्यायालयाने स्पष्ट केले. राजस्थानमधील जिल्हा दूध संघांशी संबंधित एका निवडणूक वादावर सुनावणी करताना,



न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती आर. महादेवन यांच्या खंडपीठाने हे निरीक्षण नोंदवले.

'ज्योती बसू आणि इतर विरुद्ध देवी घोषाल आणि इतर' आणि 'जावेद आणि इतर विरुद्ध हरियाणा राज्य आणि इतर' या खटल्यांमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने अधिकृतपणे असा निर्णय दिला होता की, मतदानाचा आणि निवडणूक लढवण्याचा अधिकार स्वरूपतः केवळ 'वैधानिक' (कायद्याने प्राप्त झालेले) आहेत आणि कायद्याने ज्या मर्यादेपर्यंत ते प्रदान केले आहेत, केवळ त्याच मर्यादेपर्यंत त्यांचे अस्तित्व असते, असे न्यायालयाने निकालात नमूद केले.

■ मतदानाचा अधिकार एखाद्या सदस्याला वैधानिक तरतुदींनुसार आपला मतदानाचा हक्क बजावण्यास सक्षम करतो; तर निवडणूक लढवण्याचा किंवा निवडून येण्याचा अधिकार हा एक वेगळा आणि अतिरिक्त अधिकार आहे.

मतदानाचा अधिकार एखाद्या सदस्याला वैधानिक तरतुदींनुसार आपला मतदानाचा हक्क बजावण्यास सक्षम करतो; तर निवडणूक लढवण्याचा किंवा निवडून येण्याचा अधिकार हा एक वेगळा आणि अतिरिक्त अधिकार आहे. या अधिकाराला पात्रता, निकष आणि अपात्रतेच्या अटी लागू करणे पूर्णपणे कायदेशीर आणि योग्य ठरते, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले.

दरम्यान, राजस्थान राज्यातील विविध 'जिल्हा दूध संघांच्या' व्यवस्थापन समितीच्या (संचालक मंडळाच्या) निवडणुकांशी संबंधित प्रकरणाच्या वादावर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करत होते. या प्रकरणाचा निकाल देताना सर्वोच्च न्यायालयाने सदर निरीक्षण नोंदवले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### गोव्यातील कॉमनवेल्थ संसदीय परिषदेत 'विकसित भारत 2027'चे दूरदृष्टीपूर्ण व्हिजन

पिंपरी (दैनिक संध्या) : गोव्यात आयोजित कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोसिएशन (CPA) वेस्ट झोन-VII च्या प्रतिष्ठित परिषदेत महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य श्री. अमित गोरखे यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण आणि अभ्यासपूर्ण भाषणातून राष्ट्रीय नेतृत्वाचे लक्ष वेधून घेतले. ८ ते १० एप्रिल दरम्यान पणजी येथे पार पडलेल्या या तीन दिवसीय परिषदेत त्यांनी 'विकसित भारत 2047: युवा लोकप्रतिनिधींची भूमिका' आणि 'शाश्वत पर्यटनाचा विकासात्मक प्राधान्यक्रम' या दोन महत्त्वपूर्ण सत्रांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले. विशेष म्हणजे महाराष्ट्र, गुजरात आणि कर्नाटक या तीन राज्यांतील मोजक्या लोकप्रतिनिधींची या परिषदेसाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये आमदार अमित गोरखे यांची निवड करण्यात आली असून, या महत्त्वपूर्ण बैठकीत त्यांनी राज्याचे प्रतिनिधित्व केले. पहिल्या सत्रात बोलताना आमदार अमित गोरखे यांनी भारताच्या भविष्यनिर्मितीत युवा लोकप्रतिनिधींची भूमिका अधोरेखित केली. ते म्हणाले, "युवा विधायक हे फक्त उद्याचे नेते नसून ते आजचे 'चेंज एजंट्स' आहेत. विकसित भारत 2047 चा ध्यास साध्य करण्यासाठी धाडसी, समावेशक आणि नैतिक निर्णय घेण्याची आपली क्षमता अत्यंत महत्त्वाची आहे, ज्यामुळे सर्वसमावेशक विकास सुनिश्चित होईल." दुसऱ्या सत्रात आमदार गोरखे यांनी शाश्वत पर्यटन आणि गोवा-महाराष्ट्र किनारपट्टीवरील मजबूत कनेक्टिव्हिटीची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले, "गोवा केवळ समुद्रकिनाऱ्यांसाठी ओळखला जाऊ नये, तर 'शाश्वत पर्यटन'चा जागतिक आदर्श बनावा. विकास करताना आपल्या नैसर्गिक वारशाचे संरक्षण करणे अत्यावश्यक आहे." याच अनुषंगाने त्यांनी पालघरपासून गोव्याच्या किनारपट्टीपर्यंत 'युनिफाइड टुरिस्ट सर्किट' उभारण्याचा प्रस्ताव मांडला, ज्यामुळे पश्चिम किनारपट्टीवरील आर्थिक विकासाला चालना मिळेल. या परिषदेला लोकसभेचे अध्यक्ष श्री. ओम बिर्ला, गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, राज्यसभेचे उपसभापती श्री. हरिवंश नारायण सिंह, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे आणि गुजरात विधानसभेचे अध्यक्ष श्री. शंकरभाई चौधरी यांची उपस्थिती लाभली. या मान्यवरांच्या उपस्थितीत आमदार गोरखे यांनी हरित पायाभूत सुविधांच्या विकासावर भर देत डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून पारदर्शक, जबाबदार आणि नागरिककेंद्रित प्रशासन राबवण्याचा आग्रह धरला.

### चिंचवड येथे नदीपात्रात मातीचा भराव टाकल्या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल

चिंचवड (दैनिक संध्या) : चिंचवडमध्ये मोकळ्या जागेत अनधिकृतपणे मातीचा भराव टाकून पवना नदी पात्र आणि नैसर्गिक नाल्याची रुंदी कमी करून पर्यावरणाला हानी पोहोचवल्या प्रकरणी दोन जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खंडू दामु चिंचवडे आणि धनंजय खंडू चिंचवडे (दोघेही रा. चिंचवडे लॉन्स जवळ रिवर व्यू हॉटेलच्या समोर चिंचवड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी महापालिका पर्यावरण विभागातील अभियंता पंकज धेंडे यांनी चिंचवड पोलिसात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १ मार्च २०२६ ते १० एप्रिल २०२६ या कालावधी दरम्यान चिंचवड येथील सिटी सर्व्हे क्र. २००७ या मोकळ्या जागेत आरोपींनी अनधिकृत माती टाकून भराव केला. या कृत्यामुळे पवना नदी तसेच लगतच्या नैसर्गिक नाल्याच्या पाण्याचा प्रवाह अडथळित झाल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील विविध कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बळीफ हे करीत आहेत. या प्रकारामुळे पर्यावरणप्रेमींकडून नाराजी व्यक्त होत असून, पर्यावरणाला हानी पोहोचवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी होत आहे.



### सोशल मीडियाच्या लाईक्ससाठी जीवाशी खेळ; तरुणाला पोलिसांनी शिकवला धडा

पिंपरी (दैनिक संध्या) : सोशल मीडियावर प्रसिद्धी आणि लाईक्स-व्ह्यूजच्या हव्यासापोटी तरुणांकडून धोकादायक स्टंट करण्याचे प्रकार वाढताना दिसत आहेत. अशाच एका धक्कादायक घटनेत वाकड परिसरात एका २० वर्षीय तरुणाने थार गाडीने भरधाव स्टंटबाजी करत स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घातला. सदर तरुणाने वर्दळीच्या रस्त्यावर तसेच फूटपाथवर थार गाडी चालवत रॅश ड्रायव्हिंग केली. हा संपूर्ण प्रकार रील बनवण्यासाठी शूट करण्यात आला होता. विशेष म्हणजे, हा व्हिडिओ त्याने स्वतःच सोशल मीडियावर पोस्ट केला होता, जो नंतर वेगाने व्हायरल झाला. व्हिडिओ समोर येताच पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली. तांत्रिक तपासाच्या आधारे संबंधित तरुणाचा शोध घेण्यात आला आणि त्याला व त्याच्या मित्राला ताब्यात घेण्यात आले. पोलीस स्टेशनमध्ये आणल्यानंतर तरुणाची 'रील स्टार'ची हवा उतरली. पोलिसांनी कडक शब्दांत समज दिल्यानंतर त्याने हात जोडून माफी मागितली आणि पुन्हा असे कृत्य न करण्याचे आश्वासन दिले. रील्स आणि लाईक्सच्या नादात कायद्याशी खेळ करू नका, अन्यथा कारवाई अटळ आहे, असा स्पष्ट इशारा पोलिसांनी दिला आहे.

# पिंपरी चिंचवड महापालिकेतील 'लचकेतोड' थांबेनाच..!

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड महापालिकेत गेल्या चार वर्षातील प्रशासकीय काळात अब्जावधी रूपयांची संगनमताने दरोडेखोरी झाल्याचे आणि पालिका लुटणारे सगळे सराईत चोर सहीसलामत सुटल्याचे प्रकरण ताजे असतानाच याच महापालिकेतील ५२ कोटींचा नवा घोटाळा उजेडात आला आहे. नव्याने निवडून आलेल्या नगरसदस्यांची दिशाभूल करून, त्यांच्या खोट्या सह्या करून ठेकेदारांची कोट्यवधींची देयके (बीले) परस्पर मंजूर करण्यात आली आहेत. हे करत असताना जवळपास ८० ठेकेदारांकडून प्रत्येकी पाच टक्के कमिशन घेण्यात आल्याचे सांगण्यात येते. हे प्रकरण खळबळजनक तितकेच गंभीरही आहे.

स्थायी समिती, सर्वसाधारण सभा तथा आयुक्तांची मान्यता आवश्यक असताना, सर्वांनाच पूर्णपणे अंधारात ठेवून 'मार्च एन्डींग'च्या घाईगडबडीत नियोजनबध्दरित्या झालेला हा आतबट्ट्याचा व्यवहार उघड झाल्याने अनेकांचे पित्त खवळले आहे. ठेकेदारांनी केलेल्या कामांची बिले देण्यात काहीच गैर नव्हते. मात्र, ज्या पध्दतीने हे सारे घडवून आणण्यात आले, ते निश्चितपणे आक्षेपार्ह आहे.

तरतूदींचे वर्गीकरण करणे, तरतुदींची वाढ / घट करणे हा बाराही महिने सुरू असणारा प्रशासकीय प्रकार आहे. यात वर्षानुवर्षे हमखास गैरप्रकार होत असतात. यातील नेमके अर्थकारण (टक्केवारीचा धंदा) फारसे कोणाच्या लक्षात येत नाही. त्याचाच फायदा बजेट चोरांकडून घेतला जातो.

वरकरणी दिसते तितके हे प्रकरण साधे, सरळ नाही. हा घोटाळा एका दिवसात झालेला नाही. त्यासाठी नियोजनबध्द बैठका होत होत्या. कुठे किती तरतूद आहे, ती खर्च होईल की होणार नाही, याची सविस्तर माहिती घेतली जात होती. लेखा विभागातील 'झारीतील शुक्राचार्य' यातील पळवाटा, खाचाखोचा सांगत होते. ज्या ठेकेदारांची बीले काढून देण्यात येणार होती, त्याची यादी तयार करून प्रत्येकी पाच टक्के कमिशन ठरले होते. उपसूचनांसाठी ज्या नगरसेवकांच्या सह्या घ्यायच्या, त्यांना दूरध्वनी केले जात होते. काही नगरसेवकांच्या सह्या ठेकेदारांनीच जाऊन घेतल्या. अनेक उपसूचनांवर नगरसेवकांच्या खोट्या सह्या आहेत. काही उपसूचनांवर नुसत्याच सह्या आहेत, पण नावे नाहीत, अशा अनेक गोष्टी याद्वारे उघड झाल्या आहेत.




**'ताटाखालचे मांजर बनू नका'**

पालिकेला पूर्णवेळ आयुक्त मिळाले आहेत. त्यांचे अधिकाऱ्यांवर, येथील कारभारावर नियंत्रण असले पाहिजे. अन्यथा, ते आयुक्त म्हणून काम करूच शकणार नाहीत. आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी उधळलेल्या मुक्ताफळांनुसार...पिंपरी-चिंचवड शहराला जगात कोणी ओळखत नाही. त्यांनी असा बोलघेवडेपणा करण्याऐवजी कामात कणखरपणा दाखवावा. सत्ताधाऱ्यांच्या ताटाखालचे मांजर बनू नये. अन्यथा, पाट्या टाकणारा आयुक्त म्हणून पिंपरी-चिंचवडकरांच्या मनात त्यांची ओळख राहील.

**'नियुक्ती ते निवृत्ती.....चौकशी व्हावी'**

पुणे महापालिकेतील शहर अभियंत्याचे दोन हजार कोटींच्या मालमत्तेचे प्रकरण सध्या चांगलेच तापलेले आहे. या पदावर असताना इतक्या प्रचंड प्रमाणात संपत्ती निर्माण करता येऊ शकते, हे पाहून कोणाचेही डोळे पांढरे होतील. शहर अभियंत्यांला या प्रमाणात वरकमाई मिळत असताना पिंपरी-चिंचवडच्या शहर अभियंत्यांनी स्वेच्छानिवृत्ती का घेतली असेल, असा प्रश्न पडू शकतो. पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही जुळी शहरे आहेत. दोन्ही महापालिकेत जवळपास सारख्याच पध्दतीने 'कारभार' चालतो. पैशांचा पाऊस पाडणारे पद हीच शहर अभियंता या पदाची ओळख आहे. मग, पिंपरीकर अभियंत्याने स्वेच्छानिवृत्तीची विसंगत वाटणारी कृती का केली असावी, याचे गूढ आहे. त्यांची पदोन्नतीच सदोष आणि तोडपाणी स्वरूपाची वाटते.

महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांनीच हा घोटाळा केल्याचा थेट आरोप स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी केला आहे. या घोटाळ्याची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. पालिकेच्या ठेवी आणि मोठ्या रकमा ठराविकच बँकांकडे ठेवल्या आहेत, यातही टक्केवारीचा खेळ झाल्याची शक्यता वाटते, याकडे त्यांनी लक्ष वेधले आहे.

संगनमताने केलेल्या घोटाळ्यात केवळ जैन यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्यात आले. हे 'वसुलीकांड' ते एकटे करूच शकत नाही. त्यांना कोणी मदत केली, कोणाच्या पाठबळावर त्यांनी एवढे धाडस केले, याविषयी बारणे यांनी अवाक्षरही काढले नाही. महापौर रवी लांडगे यांनीही आपण त्या गावचेच नाही, अशा पध्दतीने मौन धारण केले आहे. इतक्या सर्वांना फाट्यावर मारण्याचा मुजोरपणा एखाद्या अधिकाऱ्यात कोणामुळे आला, ते उघड होणे आवश्यक आहे. सगळं काही नियमानुसार झाल्याचे सांगून जैन यांनी सर्वच आरोप फेटाळले आहेत. उपसूचनांवर सूचक व अनुमोदक म्हणून नगरसेवकांच्या सह्या होत्या. बिलांसाठी तरतुदी उपलब्ध होत्या. त्यामुळेच पुढील कार्यवाही करण्यात आल्याचे जैन यांचे म्हणणे आहे.

या प्रकरणाचा खूपच बोभाटा झाला. पेपरबाजी झाली. टीव्हीवर बातम्या झळकल्या. काहीतरी केल्याचे दाखवावे लागेल म्हणून आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी ठेकेदारांची बीले थांबवली. (तात्पुरतीच) याप्रकरणी पाच अधिकाऱ्यांची 'चौकशी समिती' नेमली. २४ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीसह गेल्या ३ वर्षात लेखा विभागात झालेल्या गैरप्रकारांचा मागोवा या समितीकडून घेण्यात येईल, असे स्पष्ट करत सखोल व निष्पक्ष चौकशीची ग्वाही आयुक्तांनी दिली. एखाद्या प्रकरणात चौकशी समिती स्थापन करणे म्हणजे वेळकाढूपणा. तापलेले एखादे प्रकरण थंड करून ते मिटवण्यासाठी पुरेपूर कालावधी उपलब्ध करून देण्याची ती व्यवस्था असते, अशीच धारणा आहे. 'मी काही दिवसांसाठी अर्जित रजेवर जातोय' असे जैन यांनी पत्रकारांना सांगितले होते. असे असताना आयुक्तांनी मात्र जैन यांना 'सक्तीच्या रजेवर' पाठवण्याचे आदेश काढलेत. अशी फुटकळ आणि दिशाभूल करणारी कारवाई या प्रकरणात अपेक्षित नाही. जैन रजेवर असतानाच त्यांची परस्पर बदली करून त्यांना व्यवस्थित संरक्षण देण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन सक्तीच्या रजेवर

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेमधील तब्बल ५२ कोटी रुपयांच्या आर्थिक प्रकरणामुळे मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी समिती नेमण्यात आली आहे.

आयुक्त विजय सूर्यवंशी यांनी आदेशात म्हटले आहे की, सन २०२५-२६ आणि २०२६-२७ च्या अंदाजपत्रकातील तरतुदींमध्ये बदल करून करण्यात आलेल्या बिल अदायगी तसेच मागील तीन वर्षांतील तत्सम प्रकरणांची चौकशी केली जाणार आहे.

चौकशी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रवीण जैन यांना तात्काळ प्रभावाने सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे.



तसेच, त्यांच्या पदाचा अतिरिक्त कार्यभार मुख्य लेखा परीक्षक प्रमोद भोसले यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. प्रशासनाकडून या प्रकरणाचा तपास सुरू असून, दोषींवर कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

या घडामोडींमुळे महापालिकेत एकच खळबळ उडाली असून, पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## PMPML बस कंत्राट प्रक्रिया संशयाच्या घेऱ्यात, दोषींवर कठोर कारवाई करा

### आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात वेधले सरकारचे लक्ष

**पिंपरी (दै. संध्या)**

महानगर परिवहन महामंडळाच्या कार्यपद्धतीवर आणि सीएनजी बसेस भाडेतत्त्वावर घेण्याच्या प्रक्रियेतील पारदर्शकतेवर आमदार अमित गोरखे यांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. विधानपरिषदेत त्यांनी या प्रकरणातील आर्थिक गैरव्यवहार आणि प्रशासकीय अनागोंदीवर सरकारचे लक्ष वेधले.





पीएमपीएमएलच्या निविदा प्रक्रियेमध्ये पारदर्शकता राखणे अत्यंत आवश्यक आहे. नियमानुसार सुरक्षा ठेव म्हणून 'बँक गॅरंटी' स्वीकारणे अपेक्षित असताना, केवळ 'चेक' स्वीकारण्यामागील नेमकी तांत्रिक बाजू काय आहे, याचे स्पष्टीकरण प्रशासनाने देणे गरजेचे आहे. तसेच, सीएनजी बस खरेदीचा करार ज्या वेगाने पूर्ण झाला, त्यामागे नेमकी प्रशासकीय निकड काय होती, यावरही प्रशासनाने प्रकाश टाकावा. एकाच कंत्राटदाराला सातत्याने मोठी कामे मिळणे, हे त्या कंत्राटदाराच्या कार्यक्षमतेचे निदर्शक असू शकते, मात्र या संपूर्ण प्रक्रियेत नियमांचे पालन झाले आहे का, याची सखोल शहानिशा होणे जनहिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. प्रशासनाने या सर्व बाबींकडे गांभीर्याने लक्ष देऊन वस्तुस्थिती समोर आणावी, अशी आग्रही मागणी आमदार अमित गोरखे यांनी सभागृहात केली आहे.

या विषयावर उत्तर देताना मंत्री उदय सामंत यांनी ही प्रक्रिया पारदर्शक असल्याचे सांगत, तत्कालीन सीएमडी देवरे यांची बदली झाल्याचा उल्लेख केला. मात्र, केवळ बदलीने ही जबाबदारी संपत नाही. या निविदा प्रक्रियेला मान्यता कोणाकोणी दिली, त्यामागील तारखांचा मेळ काय आणि चेक स्वीकारण्याचा निर्णय कोणत्या अधिकाऱ्याने घेतला, या सर्व बाबींची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. आमदार अमित गोरखे यांनी या संपूर्ण प्रकरणात पुराव्यानिशी चौकशीची मागणी केली आहे. जनतेच्या हितासाठी आणि पारदर्शकतेसाठी या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत हा लढा सुरूच राहील, असे प्रतिपादन आमदार अमित गोरखे यांनी केले आहे.



# महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धेला उत्साहात सुरुवात

**पिंपरी (दै. संध्या)**

शरीरसौष्ठव घडवताना स्टिरॉइड्ससारख्या औषधांचे सेवन करून कृत्रिम पद्धतीने शरीर बनवण्याच्या ऐवजी तरुणांनी नैसर्गिक बॉडी बिल्डिंगकडे लक्ष देत आरोग्यपूर्ण जीवनशैलीचा अवलंब करावा, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगर पालिकेच्या वतीने इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशन, महाराष्ट्र बॉडी बिल्डर्स असोसिएशन यांच्या संयुक्तविद्यमाने व पिंपरी चिंचवड अमेच्यूर बॉडी बिल्डिंग असोसिएशन यांच्या सहकार्याने 'महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा २०२६' चे आयोजन चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उद्‌घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे,नगरसदस्य धर्मपाल तंतरपाळे,शितल शिंदे, मंदार देशपांडे, नगरसदस्या अर्चना सस्ते यांच्यासह इंडियन बॉडी बिल्डिंग अँड फिटनेस फेडरेशनचे डॉ. संजय मोरे, राजेश सावंत, ॲड. सचिन रणदिवे, महापालिकेचे उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह स्पर्धक आणि नागरिक उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, 'तरुणांनी आरोग्याला सर्वाधिक प्राधान्य देत नैसर्गिक पद्धतीने शरीरसौष्ठव घडवण्यावर भर द्यावा. आरोग्य हीच खरी संपत्ती असून इतर सर्व संपत्तीपेक्षा ती अधिक महत्त्वाची आहे. पैसा, प्रतिष्ठा आणि इतर गोष्टी आयुष्यात पुन्हा मिळू शकतात; मात्र एकदा आरोग्य बिघडले तर ते पूर्ववत करणे कठीण असते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या शरीरावर प्रेम करत नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि संयम यांचा अवलंब करून नैसर्गिक बॉडी बिल्डिंगकडे लक्ष द्यावे,' असे देखील त्यांनी सांगितले. प्रत्येक खेळाडू जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहतो आणि स्वतःला ओळखून आनंदाने आयुष्य जगतो. त्यामुळे तरुणांना प्रेरणा देण्यासाठी आणि निरोगी जीवनशैली रुजवण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या ठरतात, असे देखील महापौर रवि लांडगे यांनी सांगितले. भाऊसाहेब भोईर म्हणाले, 'वयाची पहिले पंचवीस वर्षे आम्ही स्वतःवर, व्यायामावर प्रेम केल्याने आज लोक आमच्यावर प्रेम करतात. प्रशासनाने ही स्पर्धा कमी वेळात आयोजित केली, त्याबद्दल त्यांचे कौतुक करतो. अशा स्पर्धा पिंपरी चिंचवड शहरातील तरुणांना प्रेरणादायी ठराव्यात, यासाठी या स्पर्धेला जास्तीत जास्त प्रतिसाद मिळेल, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.' कैलास कुटे म्हणाले, 'प्रत्येकाने शरीरस्वास्थ्य चांगले ठेवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. शरीर चांगले ठेवण्यासाठी व्यायाम करणे गरजेचे आहे. अशा कार्यक्रमात पिंपरी चिंचवड शहरातील सर्व खेळाडूंचा सहभाग असणे गरजेचे आहे. अशा स्पर्धांमुळे तरुणांना प्रोत्साहन मिळत असते,' असे देखील ते म्हणाले.

डॉ. संजय मोरे म्हणाले, या स्पर्धेत २३ लाखांची रोख बक्षिसे दिली जात आहेत. स्पर्धा घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने केलेले सहकार्य निश्चितच महत्त्वपूर्ण आहे. आगामी काळात आशियाई स्पर्धांचे पिंपरी चिंचवड शहरात आयोजन करण्यासाठी महापालिकेने पुढाकार घ्यावा अशा स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरातील तरुण स्वतःवर व व्यायामावर प्रेम करतील.'

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त पंकज पाटील यांनी, सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार शितल शिंदे यांनी मानले.

**विविध राज्यातील ४९५ हुन अधिक खेळाडू सहभागी**

महापौर चषक राष्ट्रीय शरीरसौष्ठव स्पर्धा २०२६ मध्ये महाराष्ट्र सह जम्मू-काश्मीर, केरळ, उत्तर प्रदेश , आसाम पश्चिम बंगाल अशा विविध राज्यातून ४४५ पुरुष व ५० महिला स्पर्धेक सहभागी झाल्या आहेत. २९ व ३० मार्च २०२६ असे दोन दिवस ही स्पर्धा चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे होणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी या स्पर्धेला उपस्थित राहून स्पर्धेचा आनंद घ्यावा, असे आवाहन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### पाण्याच्या प्रश्नावर अभियंत्यांची एकजूट ; जलसंकटावर उपाययोजनांसाठी पुढाकार

कवठे येमाई (दैनिक संध्या) : भारतात दिवसेंदिवस गंभीर होत चाललेल्या पाणी प्रश्नावर उपाय शोधण्यासाठी अभियंत्यांची एकजूट होत असल्याचे सकारात्मक चित्र समोर आले आहे. पाण्याची उपलब्धता, वापर, वाटप, संवर्धन आणि वाढते प्रदूषण या सर्व बाबींवर व्यापक चर्चा व जनजागृतीची गरज अधोरेखित करण्यात आली. १९६८ मध्ये स्थापन झालेली इंडियन वॉटर वर्क्स असोसिएशन ही देशातील अग्रगण्य संस्था असून तिचे देशभरात ३९ केंद्रे कार्यरत आहेत. सुमारे १४ हजारांहून अधिक अभियंते या संस्थेशी जोडलेले आहेत. दरवर्षी जानेवारी महिन्यात तीन दिवसीय परिषदेत पाणी विषयक तांत्रिक, प्रशासकीय आणि सामाजिक पैलूंवर सखोल चर्चा केली जाते. महाराष्ट्रात मुंबई नंतर पुणे हे या संस्थेचे मोठे केंद्र मानले जाते. पुणे सेंटरच्या चेअरमन तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे विभागाच्या मुख्य अभियंता वैशाली आवटे यांनी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत धुमाळ यांची भेट घेत जलक्षेत्रातील समस्या व दीर्घकालीन उपाययोजनांवर सविस्तर चर्चा केली. या बैठकीत आवटे यांनी जलसंपदा विभागातील अभियंत्यांनी मोठ्या प्रमाणावर या संघटनेत सहभागी होण्याचे आवाहन केले. अभियंत्यांचे संघटन मजबूत झाल्यास भविष्यातील जलसंकटावर प्रभावी उपाय शोधणे आणि ते प्रत्यक्षात राबवणे शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच या संस्थेचे जागतिक पातळीवरील अमेरिकन वॉटर वर्क्स असोसिएशन, ग्लोबल वॉटर पार्टनरशिप आणि आंतरराष्ट्रीय जल संघटना यांसारख्या संस्थांशी संबंध असल्याची माहितीही त्यांनी दिली. संस्थेचे सचिव डॉ.दयानंद पानसे यांनी संस्थेच्या कार्याची व्याप्ती, तांत्रिक माहितीचा लाभ आणि समाजहितासाठी होणाऱ्या उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.डॉ. हेमंत धुमाळ यांनी सकारात्मक भूमिका घेत जलसंपदा विभागाकडून जनजागृतीचे उपक्रम राबवले जातील आणि अभियंते सक्रिय सहभाग घेतील,असे आश्वासन दिले.पाणी प्रश्न अधिक जटिल होत असल्याने शासकीय, अशासकीय संस्था, शैक्षणिक क्षेत्र आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी एकत्र येणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.यावेळी राजेंद्र माहुलकर, व्ही. एन. शिंदे, ढोबळे, अवचट, चंदनशिवे, खजिनदार अनिल पाटील तसेच विविध अभियंते व शिरूर मधील पाणी वापर संस्थाचे प्रतिनिधी प्रकाश वायसे आवर्जून उपस्थित होते. बैठकीच्या शेवटी खजिनदार अनिल पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. एकत्रित प्रयत्न आणि जागरूकतेतूनच भविष्यातील जलसंकटावर मात करणे शक्य होईल असा आशावाद या बैठकीत व्यक्त करण्यात आला.

### होळ गावची यात्रा साध्या पद्धतीने होणार

काऱ्हाटी (दैनिक संध्या) : अजित दादा पवार यांच्या अकाली निधनाच्या घटनेमुळे बारामती तालुक्यातील मौजे होळ येथील श्री भैरवनाथ यात्रा उत्सव अत्यंत साध्या पद्धतीने व फक्त धार्मिक विधी पार पाडून साजरा करण्याचा निर्णय ग्रामस्थ,ग्रामपंचायत व यात्रा कमिटी यांच्यात झालेल्या संयुक्त बैठकीत एकमताने घेण्यात आला आहे.राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यासाठी व त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी यंदा सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत एकमताने उत्सवातील जल्लोष टाळत यंदाच्या वर्षीची यात्रा अत्यंत साध्या पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये आतिषबाजी डीजे यांना फाटा देत तमाशा व कुस्त्या रद्द करत ग्रामस्थांमध्ये श्रद्धा व परंपरा जपत संयमित वातावरणात देवाचा अभिषेक,लग्न विधी व पालखी मिरवणूक हे धार्मिक विधी पारंपारिक पद्धतीने होतील. तसेच होळ गावातील वायाळ पट्टा येथील श्री हनुमान जन्मोत्सव निमित्ताची यात्रा ही रद्द करण्यात आली आहे.त्याच अनुषंगाने होळ कांबळे वस्ती येथील भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीच्या महोत्सव निमित्ताने प्रतिमापूजन व महाप्रसाद हे उत्सवाचे कार्यक्रम साजरे केले जाणार आहेत. परंतु मिरवणूक व ऑर्केस्ट्रा कार्यक्रम रद्द करण्यात आलेला आहे.

### दिपक कारंडे यांची पोलीस निरीक्षक पदावर झेप; शिरूरकरांचा अभिमान वाढला

कवठे येमाई (दैनिक संध्या) : कर्तव्यदक्षता, शिस्तबद्ध कामकाज आणि प्रभावी जनसंपर्क यामुळे ओळखले जाणारे शिरूर पोलीस ठाण्यातील सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक कारंडे यांना राज्य शासनाकडून पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती मिळाली आहे. ९ एप्रिल २०२६ रोजी महाराष्ट्र पोलीस महासंचालक कार्यालयाने याबाबतचा आदेश जारी केला असून त्यांची नियुक्ती पुणे शहरात करण्यात आली आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ अंतर्गत पोलीस आस्थापना मंडळ क्रमांक २ मार्फत राज्यभरातील २०१ सहाय्यक पोलीस निरीक्षकांना ही पदोन्नती देण्यात आली आहे. त्यामध्ये दिपक करांडे यांचा समावेश असून त्यांच्या या यशामुळे शिरूर परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. शिरूर पोलीस ठाण्यात कार्यरत असताना करांडे यांनी विशेषतः टाकळी हाजी पोलीस दुरक्षेत्रात गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवत अनेक गुन्ह्यांचा छडा लावला. त्यांच्या कामातील काटेकोरपणा, नागरिकांशी असलेला संवाद आणि तत्परतेमुळे ते सर्वसामान्यांमध्ये लोकप्रिय ठरले.त्यांच्या या पदोन्नतीबद्दल शिरूर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध सामाजिक, राजकीय आणि नागरिकांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. कारंडे यांच्या पुढील वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

### शिरूर तालुक्यातील मलठण येथे एस आय आर मॅपिंग मोहिमेला गती

कवठे येमाई (दैनिक संध्या) : शिरूर तालुक्यातील मलठण येथील श्री भैरवनाथ मंदिर सभागृहात काल दि. १० ला एस आय आर मॅपिंग व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी कामकाजाबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन बैठक पार पडली. या बैठकीत जुन्नर उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे,शिरूरचे तहसीलदार बाळासाहेब म्हस्के,आंबेगावचे तहसीलदार सचिन वाघ तसेच तहसील कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी उपस्थित राहून सुपरवायझर,मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करीत सविस्तर सूचना दिल्या.बैठकी दरम्यान एस आय आर मॅपिंग तसेच (प्रोजिनी) प्रणालीद्वारे माहिती नोंदविण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. संबंधित कामकाजाचा आढावा घेताना आतापर्यंत हे काम अत्यंत सावकाशपणे सुरु असून उर्वरित कामकाज वेळेत पूर्ण करण्यासाठी पुढील दोन दिवस शनिवार व रविवार या काळात एस आय आर मॅपिंग विशेष मोहीम राबवून अधिकाऱ्यांनी याबाबत अचूक माहिती नोंदविण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. या उपक्रमामुळे निवडणूक प्रक्रियेतील माहिती अधिक अचूक व अद्ययावत होण्यास मदत होणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. तर मतदान केंद्रस्तरीय अधिकारी एस आय आर मॅपिंग व योग्य माहिती भरण्यास आगामी दोन दिवसांत जे टाळाटाळ व हलगर्जीपणा करतील त्यांच्यावर गुन्हा दाखल करून निलंबनाचे प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देखील देण्यात आल्याचे मलठण महसूल मंडल अधिकारी विजय फलके यांनी बोलताना सांगितले.

# अनाथ मुलींमध्ये रमल्या बालविकास मंत्री तटकरे

**सासवड (दै. संध्या)**



मायेच्या उबेत वाढणाऱ्या निरागस चेहऱ्यांमध्ये जेव्हा सत्तेचा नव्हे तर स्नेहाचा स्पर्श मिसळतो, तेव्हा तो क्षण केवळ औपचारिक राहत नाही तो हृदयात साठवून ठेवावा असा अनुभव ठरतो. अशाच भावुक वातावरणात महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे या पद्मश्री सिंधुताई सपकाळ यांच्या ममता बाल सदन बालगृहातील अनाथ मुलींमध्ये रमल्या. 'आपुलकीचा संवाद' या उपक्रमातून माईंच्या कार्याला अभिवादन करत त्यांनी मुलींच्या कलागुणांना दाद दिली आणि त्यांच्या इतिहासप्रेमाला मनापासून सलाम केला.

संस्थेत आगमन होताच प्रवेशद्वाराजवळ चिमुकल्या मुलींनी वेलकम ताई म्हणत गुलाब पुष्प देऊन स्वागत केले. त्यानंतर त्यांनी माईंच्या पुतळ्याला आणि प्रतिमेला पुष्प अर्पण करून आदरांजली वाहिली. त्या क्षणी वातावरणात एक वेगळीच भावूकता दाटून आली होती. माई आज आपल्यात नसल्या, तरी त्यांच्या कार्याच्या रूपाने त्या प्रत्येक हृदयात जिवंत आहेत, ही भावना सर्वांच्या मनात दाटून आली. मुलींमध्ये मिसळून, त्यांच्याशी संवाद साधताना मंत्री अदिती तटकरे या अक्षरशः त्या निरागस जगात रमल्या होत्या. त्यांनी सांगितले की, “संस्कार आणि विचार रुजविणे आजच्या काळात अतिशय कठीण झाले आहे. पण माईंच्या सर्व संस्थांमध्ये हे काम अत्यंत सुंदर आणि प्रभावी पद्धतीने सुरू आहे. अनेक संस्था संगोपन करतात, पण माईंची संस्था समानतेने, मायेने आणि संस्कारांनी अनाथ मुलांचे संगोपन करत असल्याचे पाहून मनाला प्रचंड समाधान मिळते.”

कार्यक्रमादरम्यान कु. सारिका आणि कु. पावनी यांनी माईंच्या जीवनावर प्रकाश टाकत अत्यंत हृदयस्पर्शी मनोगत व्यक्त केले. त्यांच्या शब्दांतून माईंच्या आयुष्याची वेदना, संघर्ष आणि मातृत्वाचे दर्शन घडले. यानंतर चिमुकल्या मुलींनी सादर केलेला ऐतिहासिक पोवाडा हा कार्यक्रमाचा विशेष आकर्षण ठरला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित या पोवाड्यातून मुलींनी युद्धकाळातील प्रसंग जिवंत केले. या कार्यक्रमाला पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांचे पहिले मानसपुत्र तथा ममता बाल सदन (बालगृह) कुंभारवळणचे अध्यक्ष दिपक गायकवाड, ममता सपकाळ, विनय सपकाळ, जिल्हा परिषद सदस्य रुपाली अमोल झेंडे, सभापती अमित झेंडे, महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, बालगृहातील मुली आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन मुकेश चौधरी यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी अधीक्षिका स्मिता पानसरे, संजय गायकवाड, गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, मंजुषा गायकवाड यांनी अथक परिश्रम घेतले.

**अनाथ मुलांचे प्रश्न मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत मांडण्याची ग्वाही...**

ममता बाल सदन, कुंभारवळण येथे झालेल्या कार्यक्रमात अध्यक्ष दिपक गायकवाड यांनी अनाथ मुलांच्या आधार नोंदणीतील अडचणींबाबत महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांचे लक्ष वेधले. यावेळी त्यांनी अनाथ मुलांचे प्रश्न सोडविण्यासाठी धोरणात्मक उपाययोजना सुचविणारे ५१ पानांचे सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनाची गांभीर्याने दखल घेत मंत्र्यांनी हा विषय मंत्रिमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत मांडण्याची ग्वाही दिली. तसेच आपल्या सचिवांना बोलावून संबंधित बैठकीत हे निवेदन सादर करण्याच्या सूचना दिल्या. अनाथ मुलांच्या प्रश्नांबाबत शासन पातळीवर सकारात्मक पावले उचलली जातील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## कौशल्य विकास केंद्राच्या विद्यमाने कारेगाव मध्ये भव्य रोजगार मेळावा संपन्न

**कवठे येमाई (दै. संध्या)**




महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) कौशल्य विकास केंद्राच्या विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या भव्य बेरोजगार मेळावा २०२६ तसेच कौशल्य विकास मार्गदर्शन शिबिर मोठ्या उत्साहात आणि प्रतिसादात संपन्न झाले. हा मेळावा काल दि. १० ला शिरूर तालुक्यातील कारेगाव येथील एमआयडीसी कौशल्य विकास केंद्रात आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून व्हर्लपूल चे प्लांट प्रमुख स्वप्नील मुळे, रांजणगाव एम आय डी सी चे कनिष्ठ अभियंता भूषण ठाणगे, अम्प्रेसनंद ग्रुपचे कमलेश नुथी, स्वरूप सर, साई सर, चैतन्य सर तसेच परिसरातील अनेक पत्रकार उपस्थित होते.

या मेळाव्यास १८ ते ४० वयोगटातील युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यामध्ये परिसरातील तसेच विविध गावांमधून मोठ्या संख्येने बेरोजगार युवकांनी सहभाग घेतला. रोजगाराच्या संधींच्या शोधात आलेल्या उमेदवारांनी विविध कंपन्यांच्या डेस्कला भेट देत मुलाखती दिल्या व आपली कौशल्ये सादर केली.

या भव्य रोजगार मेळाव्यात रांजणगाव व कारेगाव एम आयडीसी परिसरातील अनेक नामांकित कंपन्यांचा सहभाग होता. यामध्ये फ्लिपकार्ट,बजाज ऑटो, हुंदाई, एल जी, व्हर्लपूल, जाबील, ए बी इन्फोटेक, मारुती सुझुकी अशा नामांकित कंपन्यांसोबत एकूण २० कंपन्या सहभागी झाल्या होत्या. तसेच विविध क्षेत्रांतील आयटी, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स आदी उद्योगांनी उमेदवारांची थेट मुलाखत घेऊन त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. त्यामुळे अनेक युवकांना प्रत्यक्ष नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. मेळाव्याच्या दरम्यान कौशल्य विकास मार्गदर्शन शिबिरही घेण्यात आले. या शिबिरामध्ये तज्ज्ञांनी युवकांना आधुनिक उद्योगांच्या गरजा, आवश्यक कौशल्ये, तसेच करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. यामुळे युवकांना योग्य दिशादर्शन मिळाले आणि त्यांच्या भविष्यासाठी आत्मविश्वास वाढला. अँपेर्सनंद ग्रुपचे प्रोजेक्ट प्रमुख कमलेश नुथी यांनी मेळाव्याचे उद्दिष्ट आणि महत्व स्पष्ट करताना सांगितले की, “या मेळाव्याचा उद्देश तरुणांना कौशल्यावर आधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि उद्योजकता वाढवणे आहे.” तर केंद्राचे संचालक संजय पारडे यांनी भविष्यातील रोजगार संधी आणि त्यासाठी आवश्यक कौशल्यांबाबत माहिती दिली. एकूणच, एमआयडीसी कौशल्य विकास केंद्राच्या या उपक्रमामुळे परिसरातील बेरोजगार युवकांना मोठा दिलासा मिळाला असून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच त्यांना योग्य कौशल्य विकासाचे मार्गदर्शनही मिळाले. हा मेळावा युवकांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे.

## टीसी महाविद्यालयामध्ये पार पडला वार्षिक क्रीडा नैपुण्य समारंभ

**बारामती (दै. संध्या)**

बारामती मधील तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयामध्ये वार्षिक क्रीडा नैपुण्य पारितोषिक वितरण समारंभ मोठया जल्लोषात पार पडला. कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विविध खेळात विशेष यश संपादन केलेल्या तब्बल ३२५ खेळाडूंना यामध्ये १० आंतरराष्ट्रीय, ७७ राष्ट्रीय, १०४ राज्यस्तरीय व विभागस्तरावर खेळलेल्या खेळाडूंना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह, जॅकेट व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी एनसीसी विभागातील उत्कृष्ट कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला. महाविद्यालय, प्राचार्य, उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, रजिस्ट्रार आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून एकूण एक लाख तीस हजार रुपयांची पारितोषिके खेळाडूंना देण्यात आली.

या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून पै.उत्कर्ष काळे, क्रीडा विकास अधिकारी, श्री शिवछत्रपती क्रीडापीठ, बालेवाडी, पुणे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून बोलत असताना 'या महाविद्यालयाने मला ऑलिम्पिक स्पर्धेचे यश संपादन करण्याची ताकद दिली. आजपर्यंत आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्य, अशा अनेक स्पर्धांमध्ये यश संपादन करून सुवर्णपदक मिळविले आहे. याचे श्रेय मी महाविद्यालयाला देतो' असे ते म्हणाले. बोलत असताना, ते म्हणाले कि, खेळाडूंनी सरावामध्ये कमी पडता कामा नये. खेळाडूंनी यश मिळविण्यासाठी खेळामध्ये सातत्य, समर्पकता आणि जिद्द अंगी बाळगली पाहिजे असे त्यांनी सांगितले. पै,उत्कर्ष काळे यांनी त्यांचा खेळाडू ते क्रीडा विकास अधिकारी पदापर्यंतचा प्रवास उलगडून सांगितला.

संस्थेचे सन्माननीय सचिव या कार्यक्रमाचे अध्यक्ष मिलिंद शाह (वाघोलीकर) यांनी विजेत्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी सन्माननीय पाहुणे म्हणून बोलत असताना संस्थेचे खजिनदार विकास शहा (लेंगरेकर) म्हणाले कि, संस्था नेहमीच विद्यार्थ्यांच्या हितासाठी प्रयत्नरत आहे.

## मंथन परीक्षेत परीनिती कुऱ्हाडेची राज्यात झेप; जिल्ह्यात तिसरी

**आळंदी (दै. संध्या)**



मंथन राज्य सामान्य ज्ञान परीक्षा २०२६ मध्ये आळंदीतील महर्षी वाल्मिकी विद्यावर्धिनी शाळेची कु.परीनिती दिनेश कुऱ्हाडे हिने राज्यात आठवा, तर पुणे जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे आळंदीच्या शैक्षणिक कामगिरीत भर पडली असून, शहरात तिच्या कौतुकाचा वर्षाव होत आहे.

परीनितीने सातत्यपूर्ण अभ्यास, जिद्द आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर ही यशस्वी झेप घेतली. तिच्या या यशामागे वर्ग शिक्षिका विद्या खराडे यांचे मार्गदर्शन लाभले असून, संस्थेच्या संचालिका अक्षता कुलकर्णी यांनीही नियोजनबद्ध तयारी करून देत मोलाची भूमिका बजावली.

दरम्यान, या यशाबद्दल आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे व नगरसेवक सोमनाथ कुऱ्हाडे यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला. यावेळी “परीनितीचे यश हे शहरासाठी अभिमानाची बाब असून, अशा गुणवंत विद्यार्थ्यांमुळे आळंदीची शैक्षणिक ओळख अधिक बळकट होत आहे,” असे मत नगराध्यक्ष कुऱ्हाडे यांनी व्यक्त केले.

## श्री ब्रह्मनाथ विद्यामंदिर पारुंडेला ६५ हजारांची साऊंड सिस्टिम भेट

**जुन्नर (दै. संध्या)**




पारुंडे येथील श्री ब्रह्मनाथ विद्यामंदिर या विद्यालयाच्या शैक्षणिक उपक्रमांना बळकटी देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक विकासासाठी पारुंडेकर कुटुंबियांनी मदतीचा हात पुढे केला आहे. कै. दत्तात्रय हरी पारुंडेकर व कै. इंदिराबाई दत्तात्रय पारुंडेकर यांच्या पवित्र स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री. विश्वनाथ दत्तात्रय पारुंडेकर (पुणे) आणि कन्या सौ. मीनल मुकुंद कुलकर्णी (मुंबई) यांच्या वतीने विद्यालयाला ६५ हजार रुपये किमतीची 'अहुजा' कंपनीची अत्याधुनिक साऊंड सिस्टिम सप्रेम भेट देण्यात आली आहे.

शालेय जीवनात केवळ पुस्तकी ज्ञान महत्त्वाचे नसून वक्तृत्व, संगीत आणि सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो. या उपक्रमांसाठी दर्जेदार ध्वनिव्यवस्थेची गरज लक्षात घेऊन पारुंडेकर कुटुंबियांनी ही भेट दिली आहे असे मत श्री विश्वनाथ पारुंडेकर यांनी व्यक्त केले. ही साऊंड सिस्टिम विद्यालयाच्या दैनंदिन परिपाठापासून ते स्नेहसंमेलनापर्यंत सर्व कार्यक्रमांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे असे मत ब्रम्हनाथ सेवा मंडळाचे सचिव श्री दिगंबर पुंडे यांनी व्यक्त केले.

या स्तुत्य उपक्रमाबद्दल श्री ब्रह्मनाथ सेवा मंडळ, पारुंडे आणि श्री ब्रह्मनाथ विद्यामंदिर यांच्या वतीने पारुंडेकर कुटुंबियांचे विशेष आभार मानण्यात आले. "आपल्या पूर्वजांच्या स्मृती सामाजिक कार्याद्वारे जपण्याचा हा आदर्श इतर दानशूर व्यक्तींसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल," अशा भावना ग्रामस्थांनी आणि शालेय व्यवस्थापनाने व्यक्त केल्या आहेत. ही संपूर्ण साऊंड सिस्टिम विद्यालयाकडे सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी श्री ब्रह्मनाथ सेवा मंडळाचे सचिव श्री दिगंबर पुंडे , संचालक श्री तुकाराम जाधव साहेब, श्री निवृत्ती जाधव , विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन श्री विकास पुंडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री डी के पवार सर , विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यालयाच्या माजी शिक्षिका तांबे मॅडम व सर , श्री जितेंद्र पारुंडेकर हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक धनंजय राजूरकर यांनी केले तर हेमंत पवार यांनी आभार मानले. विद्यालयाच्या प्रगतीसाठी दिलेल्या या मोलाच्या योगदानाबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

# पुरंदरच्या पूर्व भागात नायगाव येथे खरीप पीक कर्ज वाटप

**पुरंदर(दै. संध्या)**



पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव व परिसरातील विविध कार्यकारी सहकारी सोसायट्यांच्या वतीने खरीप हंगामासाठी पीक कर्ज वाटपाला सुरुवात करण्यात आली. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या नायगाव शाखेत माजी आमदार व बँकेचे संचालक संजय जगताप यांच्या हस्ते पूजन करून या उपक्रमाचा शुभारंभ झाला.

यावेळी बोलताना संजय जगताप यांनी सांगितले की, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध कर्ज योजना राबविण्यात येत आहेत. शेतकऱ्यांनी या योजनांचा लाभ घेऊन आपली शेती विकसित करावी, असे आवाहन त्यांनी केले. तसेच कर्जमाफीचा लाभ थकबाकीदार व नियमित शेतकरी या दोघांनाही एकाच वेळी मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात नायगाव सोसायटी व सिद्धेश्वर सोसायटीने कर्ज वसुलीत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर व सिद्धेश्वर सोसायटीचे अध्यक्ष सिद्धेश्वर खेसे यांचा संजय जगताप यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पुरंदर तालुका विभागीय अधिकारी महेश खैरे, संचालक विलास खेसे, नायगाव शाखेचे विकास अधिकारी जयेश गद्रे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य माऊली यादव, पुरंदर नागरी पतसंस्थेचे व्यवस्थापक अनिल उरवणे, पुरंदर तालुका वसुली अधिकारी किरण जाधव, ब्रँच मॅनेजर रविंद्र मचाले, नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर, उपाध्यक्ष प्रकाश कड, सिद्धेश्वर सोसायटीचे अध्यक्ष सिद्धेश्वर खेसे, पिसर्वे सोसायटीच्या अध्यक्षा ललिता कोलते, उपाध्यक्षा सुवर्णा कोलते, राजुरी सोसायटीचे अध्यक्ष विठ्ठल भगत, मावडी सुपे सोसायटीचे अध्यक्ष अशोक बहिरट, संचालक रोहिदास कड, काशिनाथ खळदकर, संदीप खेसे, अर्जुन पाटोळे, मोहन चौंडकर, बाबासाहेब चौंडकर, गिरीधर चौंडकर, प्रदीप खेसे, वसंत जगताप, दादा चौंडकर, दिलीप मेमाणे, सुरेश कोलते, आप्पा कोलते, संतोष कोलते, दत्तात्रय भगत, रामदास कड, सुदाम कड, मिलिंद जगताप, रुपेश तावरे, अविनाश चव्हाण, सोहेल कामथे, रफिक शेख, तात्या गायकवाड, विश्वास मुळीक, सदाभाऊ थेऊरकर, मंगेश शेंडगे, सोमनाथ चव्हाण, सुमित बांदल, शुभम जाधव, सुरज शेख, अमित चव्हाण, गोपीनाथ यादव, सुरज खेसे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायगाव सोसायटीचे माजी अध्यक्ष व विद्यमान संचालक संदीप खेसे यांनी केले, तर आभार प्रदर्शन नायगाव सोसायटीचे अध्यक्ष चंद्रकांत चौंडकर यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### सफाई कामगारांच्या हाती 'पॅट' परीक्षेचे पर्यवेक्षण!

मुंबई (दैनिक संध्या) : -निवडणूक कामासाठी शिक्षकांना मोठ्या प्रमाणात पाचारण केल्याने मुंबईतील महापालिका शाळांमध्ये शनिवारी झालेल्या पॅट परीक्षेदरम्यान पर्यवेक्षणासाठी शिक्षकच उपलब्ध नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. परिणामी अनेक शाळांमध्ये सफाई कामगार तसेच काही ठिकाणी पालकांच्या हातीच परीक्षा पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपवावी लागल्याचे वास्तव उघड झाले आहे. इयत्ता दुसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (एससीईआरटी) दरवर्षी पॅट परीक्षा आयोजित करते. यंदा 11 व 15 आणि 22 एप्रिल रोजी परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, शनिवारी प्रथम भाषेच्या पहिल्या पेपरचे आयोजन राज्यभरात करण्यात आले होते. परीक्षेच्या सुरुवातीलाच प्रश्नपत्रिका अपुऱ्या आल्याने अनेक शाळांमध्ये गोंधळ निर्माण झाला होता. त्यातच दोन हजारांहून अधिक शिक्षकांना तातडीने निवडणूक कामावर हजर राहण्याचे आदेश देण्यात आल्याने शाळांमध्ये शिक्षकांची उपस्थिती कमी होती. त्यामुळे काही शाळांनी सफाई कामगारांना पर्यवेक्षक म्हणून वर्गांवर पाठवले, तर काही ठिकाणी विद्यार्थ्यांना शाळेत सोडण्यासाठी आलेल्या पालकांची मदत घेण्यात आली, अशी माहिती काही पालकांनी दिली. या गंभीर प्रकाराबाबत पालिकेच्या शिक्षण विभागाशी दूरध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला; मात्र शिक्षणाधिकाऱ्यांकडून कोणतीही प्रतिक्रिया मिळू शकली नाही. या धक्कादायक प्रकारामुळे पॅट परीक्षेचा मूळ उद्देश धोक्यात आल्याची भावना पालकांमधून व्यक्त होत आहे. या प्रकारामुळे अनेक ठिकाणी पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. पुढील पेपरवेळी अशा प्रकारची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी शिक्षकांना निवडणूक कामातून वगळावे, अशी मागणी मुख्याध्यापकांकडून होत आहे.



### टक लावून पाहणे, चोरुन पाहणे हे गुन्ह्यात मोडत नाही

मुंबई (दैनिक संध्या) : कामाच्या ठिकाणी महिला सहकाऱ्याच्या शरीराकडे एकटक पाहणे अनैतिक असले तरी ते भारतीय दंड संहितेच्या कलम 354-सी अंतर्गत व्हॉयरिझमचा गुन्हा ठरत नाही, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला. तसेच एका वरिष्ठ अधिकाऱ्याविरुद्धचा एफआयआर रद्द केला. अशा वर्तनावर कंपनीच्या अंतर्गत समितीमार्फत कारवाई होऊ शकते, ते गुन्हेगारी स्वरूपाचे नाही, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. न्या. अमित बोरकर यांच्या एकलपीठाने हा निर्णय दिला. न्यायालयाने एका विमा कंपनीच्या कार्यकारी अधिकाऱ्याविरुद्ध दाखल करण्यात आलेला एफआयआर रद्द केला आणि कायद्याचा विस्तार स्पष्ट शब्दांपलीकडे करता येत नाही. खटला पुढे चालवणे हा कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर ठरेल, असे न्यायालयाने नमूद केले. मीटिंगदरम्यान आरोपी नजरेला नजर न देता तिच्या शरीराच्या अवयवांकडे एकटक पाहत असे आणि असभ्यपणे टिप्पणी करीत असे. या प्रकरणाची सविस्तर सुनावणी घेतल्यानंतर न्यायालयाने निरीक्षणे नोंदवली. कायदेशीर तरतूद परनिरीक्षणाच्या गुन्ह्याची व्याख्या करते आणि त्यासाठी शिक्षा देते. यात एखाद्या स्त्रीच्या खासगी कृत्यादरम्यान तिला पाहणे, तिची छायाचित्रे घेणे किंवा ती प्रसारित करणे यांचा समावेश होतो.




### स्कूल बसमध्ये सीसीटीव्ही, ट्रॅकिंग प्रणाली बंधनकारक

मुंबई (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रत्येक शालेय बसमध्ये सीसीटीव्ही, डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग प्रणाली, पॅनिक बटण राज्य सरकारने बंधनकारक केले आहे. परिवहन विभागाने शालेय बसचे भाडे निश्चित केले असून आता विद्यार्थ्यांकडून मासिक भाडेच आकारले जाणार आहे. पूर्ण वर्षाची एकरकमी आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली असून नवे धोरण येत्या शैक्षणिक सत्रापासून लागू केले जाणार आहे. दोन वर्षांपूर्वी बदलापूर येथील शाळेत विद्यार्थिनींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर सरकारने शालेय बस धोरणासंदर्भात बदल करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी निवृत्त न्यायमूर्ती साधना जाधव आणि शालिनी फणसळकर-जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत अहवाल सादर केला. या अहवालाच्या शिफारशींच्या आधारे शालेय बस धोरणाबाबत गृह विभागाने 'महाराष्ट्र मोटार वाहन (प्रथम सुधारणा) नियम, 2026' मसुदा तयार करून त्यावर हरकती व सूचना मागविल्या आहेत.

### खळबळजनक! अंगणवाडीत मुलांनी खाल्लं उंदीर मारण्याचं औषध, 5 जणांची प्रकृती बिघडली

मध्य प्रदेश (दैनिक संध्या) : मध्य प्रदेशातील मंडला जिल्ह्यातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. एका अंगणवाडी केंद्रात झालेल्या मोठ्या निष्काळजीपणामुळे पाच चिमुकल्यांचा जीव धोक्यात आला होता. अंगणवाडी सेविकेने ठेवलेलं उंदीर मारण्याचे औषध मुलांनी 'प्रसाद' समजून खाल्लं, त्यानंतर त्यांची प्रकृती बिघडू लागली. तातडीने या मुलांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. ही घटना मोहगाव विकासखंडातील रमखिरिया ग्रामपंचायतीच्या छपरा टोला येथील अंगणवाडी केंद्रात घडली. अंगणवाडी सेविका ज्या घरात हे केंद्र चालवते, तिथे तिने कोपऱ्यात पिठात मिसळून उंदीर मारण्याचं औषध ठेवलं होतं. खेळता खेळता मुलांचं लक्ष त्याकडे गेले आणि त्यांनी ती खाण्याची वस्तू किंवा 'प्रसाद' समजून खाल्लं. औषध खाताच मुलांना उलट्या सुरू झाल्या आणि त्यांची प्रकृती गंभीर होऊ लागली.

# नाशिकमध्ये धर्मांतराचे धक्कादायक रॅकेट!

## बहुराष्ट्रीय कंपनीत कर्मचाऱ्याचा धार्मिक छळ; हिला कर्मचाऱ्यांची लैंगिक शोषण व जबरदस्तीने धर्मांतर

नाशिक (दै. संध्या)



राज्यात खळबळ उडवून देणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांची लैंगिक शोषण व जबरदस्तीने धर्मांतर या प्रकरणांमध्ये आता तपासात धक्कादायक माहिती समोर येत आहे. एका पुरुषाचे जबरदस्तीने धर्मांतर करून घेतले आहे. त्यासाठी विशिष्ट प्रकारची त्याला वागणूक देण्यात आली असा जबाब या प्रकरणातील पीडित व्यक्तीने दिला आहे. बहुराष्ट्रीय कंपनीत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने आपल्या सहकाऱ्यांविरोधात धार्मिक छळ, जबरदस्ती धर्मांतराचा प्रयत्न, मानसिक अत्याचार व धमकी दिल्याची गंभीर तक्रार केली आहे. सन २०२२ पासून ते २३ मार्च २०२६ पर्यंत हा प्रकार सातत्याने सुरू असल्याचा आरोप संबंधित कर्मचाऱ्याने केला आहे.

तक्रारदाराने दिलेल्या माहितीनुसार, कंपनीत रुजू झाल्यानंतर त्याच्या टीममध्ये तौसिफ अत्तार, दानिश शेख, शाहरूख शेख व रझा मेमन हे सहकारी होते. त्यापैकी तौसिफ अत्तार हा टीम लीडर असल्याने त्याच्या सूचनांचे पालन करणे भाग पडत होते. मात्र, त्याने स्वतःचे व इतरांचे काम तक्रारदारावर टाकून त्याच्याकडून अतिरिक्त काम करून घेतल्याचा आरोप आहे. याचबरोबर, कामाच्या ठिकाणी धार्मिक विषयांवरून सातत्याने चर्चा करून हिंदू धर्माविषयी आक्षेपार्ह वक्तव्ये केली जात असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारदार हा धार्मिक आचार पाळणारा असून, गळ्यात रुद्राक्ष माळ धारण करत असल्याने सहकारी त्याची चेष्टा करत, 'तुझा धर्म खोटा आहे' अशा प्रकारची वक्तव्ये करून मानसिक छळ करत असल्याचा आरोप आहे.

तसेच फिर्यादीच्या देवतांबाबत अवमानकारक टिप्पणी करून धार्मिक भावना दुखावल्या गेल्याचेही त्याने म्हटले आहे. यापुढे जात, तक्रारदाराला जबरदस्तीने नमाजपठण करायला लावणे, डोक्यावर टोपी घालून फोटो काढणे व तो सोशल मीडियावर प्रसारित करणे तसेच कलमापठण करण्यास भाग पाडणे अशा प्रकारचे प्रकार घडल्याचे समोर आले आहे.

इतकेच नव्हे, तर तक्रारदार हा शाकाहारी असूनही त्याला धमकी देत बळजबरीने नॉनव्हेज खाण्यास भाग पाडण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. तक्रारदाराच्या कुटुंबातील अडचणींचा फायदा घेत 'धर्म बदलल्यास सर्व समस्या सुटतील' असा दबाव टाकण्यात येत असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

## ऑनलाईन गमावले अन् न्यायालयात कमावले


मुंबई (दै. संध्या)

चार वर्षांपूर्वी अनधिकृत ऑनलाईन व्यवहारांद्वारे 38.04 लाख रुपये गमावलेल्या पुण्यातील व्यावसायिकाला उच्च न्यायालयाने मोठा दिलासा दिला. न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने व्यवसायिक सुबोध कोर्डे यांनी गमावलेले 38.04 लाख रुपये परत देण्याचे आदेश एचडीएफसी बँकेला दिले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार झिरो लायबिलिटी अंतर्गत परताव्यासाठी पात्र असल्याचे स्पष्ट केले.

कोर्डे यांच्या बँक खात्यातून अवघ्या 41 मिनिटांत आठ अनधिकृत व्यवहारांद्वारे फसवणूक झाली होती. त्यांच्या व्यवहारांची मर्यादा 4 लाख रुपयांवरून 40 लाख रुपयांपर्यंत वाढवली होती. हे व्यवहार आपण केले नसून त्यासाठी कोणताही ओटीपी प्राप्त झाला नसल्याचा दावा करून बँकेला पैसे देण्याचे आदेश द्या, अशी विनंती करीत कोर्डे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्या. मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी आरबीआयच्या 6 जुलै 2017 च्या परिपत्रकाचा आधार घेत खंडपीठाने ग्राहकाचा निष्काळजीपणा सिद्ध करण्याची जबाबदारी बँकेची आहे. जर ग्राहकाची चूक नसेल आणि त्याने त्वरित तक्रार केली असेल, तर त्याचे दायित्व शून्य असते. कोर्डे यांनी फसवणूक लक्षात येताच वेगाने पावले उचलली आणि त्यांच्या बाजूने निष्काळजीपणाचा कोणताही पुरावा नसल्याचे निरीक्षण नोंदवीत कोर्डे यांना 38 लाख रुपये देण्याचे आदेश बँकेला दिले.

## सायन रुग्णालयातील अग्निसुरक्षा धोक्यात

मुंबई (दै. संध्या)




सायन रुग्णालयातील एक्स-रे विभागात देखभालीनंतरही एसीचा स्फोट झाल्याची घटना नकतीच घडली होती. त्यामुळे येथील अग्निसुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित होत होते. रुग्णालयातील सुरक्षा साधनांच्या केलेल्या पाहणीत येथील बहुतांश फायर एक्स्टींग्युशरच्या पुनर्भरणाची मुदत संपल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

शनिवारी दिवसभर रुग्णालय प्रशासनाकडून सर्व यंत्रणांची तपासणी करण्यात आली. कालबाह्य व कार्यरत उपकरणांची सविस्तर माहिती गोळा करून अहवाल सादर केला जाणार असल्याचे रुग्णालय प्रशासनाकडून सांगण्यात आले. मंगळवारी 2 एप्रिल रोजी दुपारी एक्स-रे विभागात एसीचा स्फोट होऊन आग लागली होती. सुदैवाने या घटनेत जीवितहानी टळली होती. पाहणीदरम्यान अनेक ठिकाणी लावण्यात आलेले फायर एक्स्टींग्युशर एक्सपायर झाल्याचे आढळून आले. काही ठिकाणी रिफिलची मुदत संपून तब्बल दोन महिने उलटल्याचे दिसून आले.

या रुग्णालयात दररोज सुमारे पाच हजार रुग्णांची ओपीडी (बाह्यरुग्ण तपासणी) होते. सकाळच्या वेळेत मोठी गर्दी होत असते. अशा परिस्थितीत आग लागली व अग्निसुरक्षा यंत्रणा निकामी असल्यास मोठी दुर्घटना घडू शकते. सायन रुग्णालयाचे फायर ऑडिट 2025 मध्ये झाले असल्याची माहिती आहे. मात्र, प्रत्यक्षात यंत्रणांची स्थिती पाहता प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.


रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. प्रमोद इंगळे यांनी प्रक्रियेमुळे उशीर झाल्याचे मान्य केले असून, एका महिन्यात नवीन फायर एक्स्टींग्युशर बसवण्यात येतील, असे आश्वासन दिले आहे. रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी अग्नि सुरक्षेबाबतचा हा हलगर्जीपणा गंभीर असून, प्रशासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### कालबाह्य उपकरणांबाबत प्रशासन अनभिज्ञ

सायन रुग्णालयात एकूण 714 मशिन्स विविध विभागांमध्ये वापरात आहेत. यापैकी काही मशिन्सची मुदत फेब्रुवारी व मार्च महिन्यात संपल्याची बाब समोर आली आहे. मात्र, नेमकी किती मशिन्स कालबाह्य झाली आहेत आणि किती अद्याप कार्यरत आहेत, याची अचूक माहिती रुग्णालय प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## बुलेट ट्रेन प्रकल्पातील दुसऱ्या टीबीएमच्या जुळणीला सुरुवात

मुंबई (दै. संध्या)



पहिल्या बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी मुंबईतील दुसऱ्या टीबीएमच्या जुळणीला घणसोलीजवळ सावली येथे सुरुवात करण्यात आली आहे. जमिनीपासून सुमारे 39 मीटर खोलीवर हे टीबीएम तयार करण्यात येत असून ते सावलीहून विक्रोळीच्या दिशेने आपला प्रवास सुरू करणार आहे. शनिवारी 190 मेट्रिक टन वजनाचा गॅन्ट्री खाली उतरवण्यात आला. याची लांबी 18 मीटर, रुंदी 10 मीटर आणि उंची 9 मीटर आहे. दोन्ही टीबीएममध्ये मिळून एकूण 4 गॅन्ट्री असतील जे मुख्य शिल्ड असेंब्ली आणि कटरहेडला जोडले जातील. हे गॅन्ट्री टीबीएमसोबत पूर्ण उत्खनन झालेल्या बोगद्यामध्ये पुढे जात राहतील आणि उत्खनन, वॉटरप्रूफिंग, टनेल लाइनिंग सेगमेंट बसवणे अशा महत्त्वाच्या कामांसाठी उपयुक्त ठरतील. या टीबीएमद्वारे प्रारंभिक उत्खनन जुलैमध्ये सुरू होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पातील पहिल्या टीबीएमच्या जुळणीला गुरुवारी विक्रोळी येथे सुरुवात झाली. बुलेट ट्रेनसाठी सिंगल ट्यूब टनेल बांधण्यात येत असून त्याचा व्यास 13.1 मीटर असेल. हे बोगदे जमिनीपासून 25 ते 57 मीटर खोलवर आहेत. सर्वाधिक खोल बांधकाम हे 114 मीटर पारसिक टेकडीच्या खाली आहे. बीकेसी आणि शिळफाटादरम्यान 21 किमी लांबीचा बोगदा बांधला जात आहे. यात भारतातील पहिल्या समुद्राखालील बोगद्याचा समावेश आहे. ठाणे खाडीखाली 7 किमीचा हा बोगदा असेल. एकूण 21 किमीपैकी 5 किमी भुयारीकरण एनएटीएम पद्धतीने करण्यात आले असून उर्वरित 16 किमी टीबीएम वापरून केले जाणार आहे.

## नगरसेवकांच्या वाहन स्टिकरवर क्यूआर कोड

मुंबई (दै. संध्या)

नगरसेवकांच्या वाहनांसाठी महापालिकेने क्यूआर कोड असलेले स्टिकर दिले आहेत. विशेष म्हणजे एका नगरसेवकाला एकच स्टिकर देण्यात येत असल्यामुळे गाडीवर स्टिकर लावून मुंबईत फिरणाऱ्या नगरसेवकांच्या कार्यकर्त्यांना चाप बसणार असून स्टिकरचा गैरवापरही बंद होणार आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या सचिव विभागाकडून नगरसेवकांना त्यांच्या वाहनांवर पालिकेचा लोगो असलेला व नगरसेवक नाव असलेला स्टिकर दिला जातो. पूर्वी नगरसेवक मागेल तेवढे स्टिकर दिले जात होते. त्यामुळे अनेक गाड्यांवर नगरसेवक असलेले स्टिकर दिसून येत होते. विशेष म्हणजे गाडीत नगरसेवक नसतानाही अनेक कार्यकर्ते स्टिकर लावलेली गाडी घेऊन मुंबईत फिरताना दिसत होते. या स्टिकरचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेऊन, यावेळी स्टिकर वाटपावर बंधने आणली आहेत. गेल्या काही दिवसांपासून नवनियुक्त नगरसेवकांना त्यांच्या वाहनावर लावण्यासाठी स्टिकर वितरित करण्यात येत आहे. प्रत्येक नगरसेवकाला एकच स्टिकर दिला जात असून या स्टिकरवर क्यूआर कोड आहे. त्यामुळे हा क्यूआर कोड स्कॅन केल्यावर, नगरसेवकांनी दिलेल्या अधिकृत गाडीचा नंबर व नगरसेवकाचे नाव काय हे समजणार आहे. नगरसेवकाने स्टिकर्स मिळण्यासाठी पत्र दिल्यानंतर क्यूआर कोड असलेला स्टिकर त्यांना दिला जात आहे. काही नगरसेवकांनी एकापेक्षा जास्त स्टिकरची मागणी केली. महापालिका मुख्यालयात येण्यासाठी आपण वेगवेगळ्या गाड्यांचा वापर करत असल्यामुळे एकापेक्षा जास्त स्टिकर हवे असल्याचे नगरसेवकांकडून सांगण्यात आले.

# नवी मुंबईत वाहन खरेदीचा आलेख चढताच

नवी मुंबई (दै. संध्या)



नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या आकडेवारी नुसार शहरात वाहन खरेदीत लक्षणीय वाढ झाली असून, यामुळे आरटीओच्या महसुलातही मोठी भर पडली आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकी करण आणि दळणवळणाच्या सुविधा यामुळे नागरिकांचा खासगी वाहनांकडे ओढा वाढत असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

1 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या कालावधीत 40 हजार 199 वाहनांची नोंदणी झाली होती. यामधून 392 कोटी 48 लाख रुपयांचा महसूल प्राप्त झाला होता. तर 1 एप्रिल 2025 ते 31 मार्च 2026 या कालावधीत तब्बल 48 हजार 196 वाहनांची नोंद झाली असून, महसूल 426 कोटी 34 लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे. यावरून केवळ शहरातील वाहनसंख्येतच नव्हे, तर आरटीओच्या महसुलातही मोठी वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे. नवी मुंबईत 2004 पासून आतापर्यंत सुमारे 7 लाख 61 हजारांहून अधिक वाहनांची नोंदणी झाली आहे. सध्या शहराची लोकसंख्या 18 लाखांच्या आसपास पोहोचली असून, त्याच प्रमाणात वाहनसंख्याही वाढत आहे. 'स्मार्ट सिटी' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबईत वाढते औद्योगिकीकरण आणि विस्तारणारे रस्ते जाळे यामुळे खासगी वाहनांचा वापर अधिक वाढला आहे.

रेल्वे, बेस्ट, एनएमएमटी, रिक्षा असे सार्वजनिक वाहतुकीचे पर्याय उपलब्ध असतानाही, नागरिक मोठ्या प्रमाणावर खासगी वाहनांना पसंती देत आहेत. पनवेल, ठाणे, मुंबई, कल्याण-डोंबिवली, बदलापूर या भागांमधून नोकरी व व्यवसायासाठी दररोज मोठ्या प्रमाणावर नागरिक नवी मुंबईत ये-जा करतात. मात्र, सार्वजनिक वाहतुकीतील अपुऱ्या सुविधा आणि गर्दीमुळे अनेकजण स्वतःची वाहने वापरणे अधिक सोयीचे मानत आहेत. याशिवाय, वाहन खरेदीसाठी सुलभ कर्जव्यवस्था, आकर्षक ऑफर्स आणि वाढती क्रयशक्ती यामुळेही वाहन खरेदीत वाढ होत आहे. शहरातील रस्त्यांवर दुचाकी, चारचाकी, ऑटो रिक्षा तसेच खाजगी टुरिस्ट बसेस यांची संख्या झपाट्याने वाढताना दिसत आहे. नवी मुंबईमध्ये वाहन नोंदणीमध्ये सातत्याने वाढ होत असून, यामागे शहराचा वेगाने होत असलेला विकास ही प्रमुख कारणे आहेत. सुलभ कर्जप्रणालीमुळे वाहन खरेदी करणे सोपे झाले आहे. तसेच शहरातील दळणवळणाच्या गरजांमुळे खासगी वाहनांचा वापर वाढत आहे. वाहनसंख्या वाढत असताना रस्ते सुरक्षा, वाहतूक शिस्त आणि प्रदूषण नियंत्रण यावरही आम्ही विशेष भर देत आहोत. नागरिकांनी नियमांचे पालन करून सुरक्षित वाहनचालना करणे अत्यंत आवश्यक आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### दर मिळत नसल्यामुळे कांदा बराकी फुल्ल

पारगाव (दैनिक संध्या) आंबेगाव तालुक्यात रब्बी हंगामातील कांदाकाढणीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मात्र, समाधानकारक दर मिळत नसल्याने यावर्षीही कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी साठवणुकीचा पर्याय स्वीकारला आहे. त्यामुळे तालुक्याच्या पूर्व भागातील बहुतांश गावांमध्ये कांद्याच्या बराकी व चाळी पूर्णपणे भरल्याचे चित्र दिसून येत आहे. यंदा कांद्याला अपेक्षित दर न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. दरात वाढ होण्याच्या अपेक्षेने अनेक शेतकरी आपला कांदा तत्काळ विक्री न करता साठवून ठेवत आहेत. यासाठी पारंपरिक चाळींबरोबरच लोखंडी जाळीच्या आधुनिक बराकींचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात आहे. तालुक्याच्या पूर्व भागात अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. या पावसामुळे शेतात उघड्यावर ठेवलेला कांदा भिजून काही प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे उर्वरित कांद्याचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने साठवणुकीकडे वळण्याचा निर्णय घेतला. परिणामी, सध्या सर्वच ठिकाणी कांदा बराकी आणि चाळी फुल्ल झाल्या आहेत. दरम्यान, योग्य बाजारभाव मिळेपर्यंत कांदा सुरक्षित राहावा, यासाठी शेतकरी विविध उपाययोजना करीत आहेत. हवामानातील बदल लक्षात घेऊन कोरडे वातावरण आणि सुरक्षित साठवणुकीवर भर दिला जात आहे.



### झेंडू उत्पादक शेतकरी अडचणीत; अवकाळीचा फटका

लोणी-धामणी (दैनिक संध्या) आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मेंगडेवाडी, वाळुंजनगर, लाखणगाव परिसरात मोठ्या प्रमाणावर झेंडू फुलांची लागवड करण्यात आली आहे. मात्र, सध्या झेंडू फुलांचे बाजारभाव मोठ्या प्रमाणात घसरल्याने शेतकरी हतबल झाला आहे. एकीकडे कमी झालेले दर आणि दुसरीकडे अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान, या दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. मार्च-एप्रिल हा लग्नसराई, यात्रा आणि सण-उत्सवांचा हंगाम असल्याने फुलांना चांगला भाव मिळेल, अशी अपेक्षा फूल उत्पादक शेतकऱ्यांना होती. मात्र, प्रत्यक्षात बाजारभाव कोसळल्याने त्यांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. आधीच कांद्याचे दर घसरल्याने फुलांमधून तोटा भरून निघेल, अशी आशा होती; परंतु फुलांचे दरही घसरल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. सध्या झेंडूला प्रतिकिलो केवळ 10 ते 20 रुपये दर मिळत असून, इतर फुलांनाही समाधानकारक भाव मिळत नसल्याचे वाळुंजनगर येथील शेतकरी अर्जुन वाळुंज यांनी सांगितले. दरम्यान, 1 एप्रिल रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे झेंडू पिकांवर रोगराई वाढली आहे. त्यामुळे औषध फवारणीचा खर्च वाढला असून, तो परवडत नसल्याने काही शेतकऱ्यांनी झेंडूची झाडे उपटून टाकली आहेत. वाळुंजनगरचे शेतकरी जयेश वाळुंज यांनी ही माहिती दिली.

### भारत इतिहास संशोधक मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. बी. डी. कुलकर्णी यांचे निधन

बारामती (दैनिक संध्या) भारत इतिहास संशोधक मंडळाचे उपाध्यक्ष, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे अधिष्ठाता आणि महाराष्ट्र इतिहास परिषदेचे अध्यक्ष, डॉ.भगवंत देवीदास कुलकर्णी (वय ७६ ) शुक्रवारी रात्री वृध्दापकाळाने निधन झाले.वैकुंठ स्मशानभूमीत शनिवारी दुपारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा असा परिवार आहे. ते मुळचे उत्तर महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील शहादा चे रहिवासी होते. त्यांनी अहिल्यानगर येथील 'ब्रिटिश राज्याचा स्थापना व कारभार' या विषयावर पीएचडी केली. शिरूर येथे बोरा महाविद्यालयात तीस वर्षे प्राध्यापक, दोन वर्षे प्राचार्य, नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा महाविद्यालयातही प्राचार्य म्हणून काम पाहिले. निवृत्त झाल्यानंतर ते पुण्यातील टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अधिष्ठाता म्हणून कार्य करीत होते. अनेक वर्षे ते अध्यक्ष व उपाध्यक्ष म्हणून महाराष्ट्र इतिहास परिषदेमध्ये कार्यरत होते. गत दहा वर्षे ते भारत इतिहास संशोधक मंडळाचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहत होते. त्यांनी वृत्तपत्र, संशोधन पत्रिकांमध्ये इतिहासावर विपुल लेखन केले आहे. त्यांचा अहिल्यानगर जिल्ह्याचे पहिले कलेक्टर हेनरी पोटींजर यांच्या कार्यपद्धतीवर लिहलेला अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रकाशनाच्या मार्गावर आहे.

### वाघोलीत पोलिसांकडून खंडणी; आयटी अभियंत्याला धमकी, तिघे निलंबित

वाघोली (दैनिक संध्या) रात्रपाळी कर्तव्यावर असलेल्या तीन पोलिसांनी आयटी अभियंता तरुण-तरुणीला सेक्स रॅकेटमध्ये अडकविण्याची धमकी देऊन तरुणाला मारहाण करीत फोन पेद्वारे पैसे उकळल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. दरम्यान, वाघोली पोलिसांचा 'रात्रीस खेळ चाले'चा हा प्रकार पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांच्या कानावर पडताच त्यांनी तत्काळ या तिघा पोलिसांना निलंबित केले आहे. पोलिस हवालदार किरण अब्दागिरे, पोलिस शिपाई गणेश खाडे आणि किरण कांबळे, अशी या पोलिसांची नावे आहेत. परिमंडळ सातचे पोलिस उपायुक्त सोमय मुंडे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. अब्दागिरे, खाडे आणि कांबळे हे तिघे वाघोली पोलिस ठाण्यात नेमणुकीस आहेत. 2 एप्रिल रोजी खाडे आणि कांबळे हे दोघे वाघोली गावठाण बिट मार्शल म्हणून कर्तव्यावर होते. रात्री साडेअकरा वाजताच्या सुमारास त्यांना नियंत्रण कक्षाकडून कॉल मिळाला. वाघोलीतील एका सोसायटीत काही मुले रूमवर राहतात आणि मुली आणून व्हिडीओ तयार करतात. त्यानुसार खाडे आणि कांबळे हे दोघे त्या सोसायटीत पोहचले. तेथील एका 24 वर्षीय तरुणाला घेऊन हे दोघे पोलिस ठाण्यात आले. त्या रात्री ठाणे अंमलदार म्हणून अब्दागिरे कर्तव्यावर होते. कॉलच्या अनुषंगाने जर असा काही प्रकार होता, तर योग्य ती कारवाई करणे गरजेचे होते. मात्र, या तिघांनी अशी कोणतीच कारवाई केली नाही. अब्दागिरे याने तरुण-तरुणीला तुमच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून सेक्स रॅकेटमध्ये अडकवतो, तुमची नोकरी घालवतो, नातेवाइकांना बोलावून घेतो, अशा धमक्या दिल्या.




# सासवडमध्ये 'स्वच्छता महाअभियाना'चा श्रीगणेशा

**पहिल्याच दिवशी १२ टन कचरा हटवला**

सासवड (दै. संध्या)

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून सासवड नगरपरिषदेने शहरात एक व्यापक स्वच्छता क्रांती सुरू केली आहे. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या रविवारी शहरातील एका भागाचा कायापालट करण्याचा संकल्प प्रशासनाने सोडला असून, या मोहिमेचा शानदार शुभारंभ रविवारी (दि. १२) सासवड-सोनोरी मार्ग परिसरात करण्यात आला. या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ कर्मचारीच नव्हे, तर लोकप्रतिनिधींनीही हातात झाडू घेऊन प्रत्यक्ष श्रमदानात सहभाग नोंदवला. माजी आमदार संजय जगताप, नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, माजी नगराध्यक्ष मार्तंड भोंडे, यांनी प्रत्यक्ष मैदानात उतरून स्वच्छता केली. १५० स्वच्छता दूत, १० घंटागाड्या, ८ ट्रॅक्टर आणि २ जेसीबीच्या मदतीने अवघ्या ४



तासांत परिसराचा चेहरामोहरा बदलला. सोनोरी मार्गावरील सुमारे १२ टन साचलेला कचरा उचलून परिसर चकाचक करण्यात आला. सासवडने स्वच्छतेच्या बाबतीत नेहमीच देशासमोर आदर्श ठेवला आहे. आरोग्य सभापती राजन जगताप यांनी यावेळी सांगितले की, "दिवंगत नगराध्यक्ष चंदुकाका जगताप यांनी सुरू केलेला स्वच्छतेचा वारसा आजही तितक्याच निष्ठेने जपला जात आहे. याच सातत्यामुळे सासवडने 'स्वच्छ सर्वेक्षण' मोहिमेत सलग सहा वर्षे देशात अव्वल क्रमांक पटकावला आहे." यावेळी बांधकाम सभापती ज्ञानेश्वर जगताप, महिला व बालकल्याण सभापती प्रियांका जगताप, उपसभापती लिना वढणे, नगरसेविका स्मिता सुहास जगताप, शितल भोंडे, स्मिता उमेश जगताप, अर्चना जगताप, प्रदीप राऊत ज्ञानेश्वर गिरमे यांसह माजी उपनगराध्यक्ष यशवंतकाका जगताप, माजी नगरसेवक संतोष खोपडे, दिनेश भिंताडे, अॅड किशोर म्हस्के पाटील, साकेत जगताप, सौरभ वढणे, आदी मान्यवर उपस्थित होते.

> "सासवडच्या यशात नागरिकांचा वाटा मोठा आहे. प्रशासन आणि जनता यांच्या एकत्रित प्रयत्नातून सासवड शहर भविष्यातही स्वच्छतेच्या क्रमवारीत देशात अग्रस्थानी राहील."
> **- संजय जगताप, माजी आमदार**

## कलिंगड उत्पादक शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

भवानीनगर (दै. संध्या)

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धामुळे शेतीमालाच्या मागणीत मोठी घट झाली आहे. या युद्धाचा परिणाम शेतकऱ्याच्या शेतीमालावर झाला आहे. सणसर (ता. इंदापूर) येथील कलिंगड उत्पादक शेतकऱ्यांचे मागणीअभावी लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.


येथील सुनील काळे यांनी चार एकर उसाच्या पिकामध्ये कलिंगडाचे आंतरपीक घेतले होते. त्यांनी सिम्बा या कलिंगडाच्या वाणाची रोपे तयार करून लागवड केली होती. त्यासाठी चार एकरांत त्यांनी दोन लाख रुपये खर्च केले. आखाती देशात युद्ध सुरू होण्यापूर्वी व्यापाऱ्यांकडून कलिंगडाला पंचवीस रुपये किलोप्रमाणे मागणी झाली होती.

यानंतर कलिंगडाच्या तोडणीला सुरुवात झाली आणि आखाती देशात युद्ध सुरू झाले. युद्ध सुरू झाल्यानंतर कलिंगडाच्या मागणीला अद्याप व्यापारी फिरकलेच नाहीत. कलिंगडाला मागणी नसल्यामुळे दर कोसळले आहेत. युद्ध लवकर बंद होईल व कलिंगडाला मागणी वाढेल, अशी अपेक्षा आहे. मात्र, सध्या व्यापाऱ्यांकडून कलिंगडाला मागणीच होत नाही. परिणामी, 75 टक्के कलिंगडाचे जागेवरच नुकसान झाले आहे. चार एकरांमध्ये किमान 80 टन कलिंगडाचे उत्पादन काळे यांना अपेक्षित होते. यापैकी 50 टन कलिंगडाचे जागेवरच नुकसान झाले आहे. कलिंगडाच्या फळाला डाग पडले आहेत. केवळ 30 टन कलिंगडाची पाच ते सहा रुपये किलो याप्रमाणे विक्री करण्यात आली.

## बारामतीत उन्हाळ्यात वीजेचा खेळखंडोबा! ग्रामस्थ हैराण

बारामती (दै. संध्या)

बारामती तालुक्यात ऐन उन्हाळ्यात विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. विशेषतः ग्रामीण भागातील नागरिक हैराण झाले आहेत. दिवसा वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे नागरिकांना नकोसे केले आहे. बारामती तालुक्यात तापमानाचा पारा 38 अंशांवर आहे. या पार्श्वभूमीवर वीज नसल्याने उकाड्याने घामाघूम होण्याची वेळ ग्रामस्थांवर आली आहे.



भारनियमन नसतानाही दर अर्ध्या-एक तासाला वीजपुरवठा खंडित होत आहे. विशेष म्हणजे, शहरात काही प्रमाणात पूर्वसूचना दिल्या जात असल्या, तरी ग्रामीण भागात कोणतीही पूर्वसूचना न देता वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

सायंकाळी सहा ते रात्री दहा या वेळेत ग्रामीण भागात फोर्स लोडशेडिंग सुरू आहे. मात्र, याबाबत अधिकारी स्पष्ट माहिती देण्यास टाळाटाळ करतात. गावा गावांतील पिण्याच्या पाण्याच्या योजना विजेवर अवलंबून असल्याने पाणीपुरवठाही विस्कळीत होत आहे.

अधिकारी आणि वायरमनचे मोबाईल बंद असल्याने "वीज कधी येणार?" या साध्या प्रश्नाचे उत्तरही मिळत नाही. वीजपुरवठ्याच्या या अनियमिततेचा फटका लहान व्यावसायिकांनाही बसत आहे. ग्रामीण भागातील दुकानदारांनी विक्रीसाठी ठेवलेले आईस्क्रीम, शीतपेये व दुग्धजन्य पदार्थ खराब होत असल्याने त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.


ग्रामीण भागातील विजेच्या गंभीर प्रश्नावर स्थानिक पदाधिकारी, राजकीय नेते आणि विविध संघटना पूर्णपणे निष्क्रिय असल्याचे चित्र आहे. ऐन उन्हाळ्यात नागरिक त्रस्त असतानाही या प्रश्नावर कोणत्याही ठोस आंदोलनाची किंवा पाठपुराव्याची भूमिका आत्तापर्यंत घेतली गेली नाही. पूर्वी शेतकरी संघटना व विविध पक्ष-संघटना वीज, पाणी, शेती अशा मूलभूत प्रश्नांवर सातत्याने रस्त्यावर उतरून आंदोलन करीत होत्या. मात्र, सध्या "तेरी भी चूप, मेरी भी चूप" अशी परिस्थिती आहे.

## काळूबाळूच्या पाचव्या पिढीचीही रसिकांवर जादू; रांजणीत पीर साहेब महाराज यात्रेनिमित्त तमाशाचे आयोजन

पारगाव (दै. संध्या)

रांजणी येथे पीर साहेब महाराज यात्रा उत्सवानिमित्त तब्बल पंधरा वर्षांनंतर विनोद समाट काळूबाळू लोकनाट्य तमाशा मंडळाचा करमणुकीचा कार्यक्रम रंगला. पारंपरिक लोकनाट्य तमाशाची शान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या मंडळाने नेहमीप्रमाणे प्रेक्षकांची दाद मिळवत उत्कृष्ट सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.

विनोदी बतावणीने रसिकांवर अधिराज्य गाजवणाऱ्या काळूबाळू तमाशा मंडळाची परंपरा अत्यंत वैभवशाली आहे. सांगली जिल्ह्यातील खाडे कुटुंबातील सातू-हिरू कवलापूरकर, त्यानंतर शिवा-संभा कवलापूरकर, पुढे रामचंद्र-शामराव- भीमराव-लहू ऊर्फ काळू-अंकुश ऊर्फ बाळू यांनी



तमाशा कला जपली. आजची पाचवी पिढी लोककला जिवंत ठेवण्यासाठी झटत आहे.

त्यामध्ये विजयकुमार खाडे, संभाजी खाडे, सुनील खाडे, अनुपकुमार खाडे, निळकंठेश्वर खाडे, आशिष खाडे, सुशांत खाडे, नीलेशकुमार खाडे, वैभव खाडे यांचा समावेश आहे.रांजणी गावातील पीर साहेब महाराज यात्रा उत्सवात सादर झालेल्या कार्यक्रमात मंडळाने प्रेक्षकांसाठी पारंपरिक कलांची अफलातून मेजवानी दिली. गण, गवळण, मुजरा, बतावणी अफलातून सादर करत उपस्थित प्रेक्षकांना हसायला लावले.

तमाशा कलेची आयुष्यभर सेवा केलेल्या काळूबाळू यांचा शासनाने त्याकाळी पुरस्कार देऊन गौरव केला. त्यानंतर मात्र, काळूबाळूच्या कुटुंबीयांचा शासनाला विसर पडला.

आजपर्यंत खाडे कुटुंबातील कोणत्याही कलावंताला कुठलाही पुरस्कार मिळालेला नाही. काळूबाळूचे नाव चालवणाऱ्या खाडे कुटुंबातील त्यांचे मुलगे, पुतणे, नातूंना पुरस्कार द्यावा. शासनाचे पॅकेज द्यावे.

## पुण्यात स्वतंत्र कर्करोग रुग्णालय रखडले; निधी व जागेचा पेच

औंध (दै. संध्या)

पुण्यात स्वतंत्र कर्करोग रुग्णालय उभे राहावे, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण विभाग, अशा दोन्ही स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. मात्र, एकीकडे निधीची कमतरता, तर दुसरीकडे जागेचा अभाव, अशा दुहेरी कात्रीत कर्करोग रुग्णालयाचा प्रस्ताव अडकला आहे. त्यामुळे कर्करोग रुग्णांची महागड्या उपचारांपासून कधी सुटका होणार? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

औंध जिल्हा रुग्णालयाच्या परिसरात सार्वजनिक आरोग्य विभागाची 60 ते 70 एकर जागा आहे. या ठिकाणी रुग्णालय उभारणीचे नियोजन आहे. आरोग्य विभागाने राज्यातील दहा रुग्णालयांसाठी प्रस्ताव तयार केला आहे. पुणे, नाशिक येथे कर्करोग आणि अन्य आठ जिल्ह्यांमध्ये जिल्हा रुग्णालय उभारणीचे नियोजन आहे. या रुग्णालयांसाठी आरोग्य विभागाने आशियाई विकास बँकेला (एडीबी) प्रस्ताव सादर केला आहे. राज्यातील दहा रुग्णालयांसाठी सुमारे आठ हजार कोटींचा प्रस्ताव 'एडीबी'ला सादर केला आहे.

वैद्यकीय शिक्षण विभागातर्फे पुण्यात कर्करोग रुग्णालय व्हावे म्हणून 2013 पासून प्रयत्न सुरू आहेत. ससून रुग्णालय प्रशासनाने याबाबत राज्य सरकारला प्रस्ताव पाठविला आहे. ससून रुग्णालयात राज्यातील विविध जिल्ह्यांमधील कर्करोगाचे रुग्ण उपचारांसाठी येतात. सद्यःस्थितीत येथे सर्व प्रकारच्या कर्करोगाच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. सध्या केमोथेरपीची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, रेडिएशन थेरपी आणि पॅलिएटिव्ह केअरची सुविधा उपलब्ध नाही.

# थोरात यांचे संस्कार प्रेरणादायी ठरतील - ठाकरे

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील शिरोली खुर्द गावचे सुपुत्र, शिवसेना उपनेते बबनराव थोरात यांचे वडील स्व. नारायण अर्जुन थोरात यांचा प्रथम पुण्यस्मरण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला जुन्नर तालुक्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून आलेल्या मान्यवरांनी प्रतिमापूजन करून अभिवादन केले.

या पवित्र सोहळ्यास शिवजन्मभूमी जुन्नर तालुक्याचे सुपुत्र, अयोध्या येथे श्रीरामलल्ला गर्भगृहात कीर्तन करणारे एकमेव कीर्तनकार, जगदगुरु श्री तुकोबाराय विश्वकल्याण मिशनचे संस्थापक, जगदगुरुकृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांची




कीर्तनरुपी भक्तिमय सेवा संपन्न झाली. महाराजांच्या मुखातून बाहेर पडलेल्या संवादाने उपस्थित सर्वांना एक आत्मिक शांती मिळाली.

यावेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी स्व. नारायणदादा थोरात यांच्या सामाजिक कार्याची, गावच्या विकासात्मक योगदानाची, शेती आणि कौटुंबिक जबाबदारीतील अनेक आठवणींना उजाळा दिला. तसेच या विशेष प्रसंगी थोरात परिवाराने सामाजिक बांधिलकी जपत स्व. नारायण अर्जुन थोरात यांच्या स्मरणार्थ ओझर लेण्याद्री मुख्य मार्गावर उभारलेल्या 'लक्ष्मी नारायण' या भव्य प्रवेशद्वाराचे लोकार्पण महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या ऑनलाईन उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमानिमित्त शिरोली खुर्द गावातील वय वर्ष ७० पुढील जेष्ठ नागरिकांचा थोरात परिवाराच्या वतीने पाद्यपूजन व पोशाख देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमप्रसंगी शिरूर लोकसभेचे खासदार डॉ.अमोल कोल्हे, हिंगोली लोकसभेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर, जुन्नर विधानसभेचे आमदार शरददादा सोनवणे, साक्री विधानसभेचे आमदार डॉ.मंजुळा गावित, विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सत्यशील शेरकर, पुणे जिल्हा समन्वयक संभाजी तांबे, हिंगोली जिल्ह्याचे सहसंपर्कप्रमुख विनायक भिसे पाटील, शिवसेना जिल्हाप्रमुख संदेश देशमुख, अजय सावंत, जिल्हा संघटक बाळासाहेब मगर, नांदेड जिल्हाप्रमुख भुजंग पाटील, महानगरप्रमुख प्रकाश मारावर, मनोज यादव, उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, सतीश उमरेकर, बालाजी कल्याणकर, उपजिल्हा संघटक शंकर घुगे, विघ्नहर देवस्थानचे माजी अध्यक्ष जगन कवडे, जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे, छाया तांबे, पंचायत समितीच्या सभापती कमल शेळकंदे उपसभापती अमित ढोले, पंचायत समिती सदस्या उल्का मोरे, सदस्य प्रशांत डुंबरे, भाजप नेते गणेश कवडे, मा. जि.प.सदस्य मोहित ढमाले, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष तुषार थोरात, अनंतराव चौगुले, उपतालुकाप्रमुख उत्तम काशिद, अजित सहाणे, आर डी गोरडे, निलेश चव्हाण, माजी नगराध्यक्ष शाम पांडे, बालाजी गाडेकर, युवासेना महानगर प्रमुख नवज्योत सिंग गाडीवाले, महिला आघाडीच्या ज्योत्सना महाबरे, नगरसेवक नंदकुमार तांबोळी,विकास राऊत, जुन्नर शहरप्रमुख मयूर रोकडे, महाराष्ट्र कृषिभूषण जितेंद्र बिडवई, संदीप ताजने, अंबादास डोके पोलीस पाटील विक्रम मोरे, के एस ढोमसे सर, निवृत्त पोलीस अधिकारी सुभाष मोरे, गुलाब मोरे, थोरात परिवारातील सर्व सदस्य,आप्तेष्ट, नातेवाईक, शिरोली खुर्द पंचक्रोशीतील ग्रामस्थ,महिला भगिनी व युवा सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.